cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार....email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८८ | गुरुवार दि.१८ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### काश्मीर पुन्हा अशांत ; जबाबदार कोण ?

अनुच्छेद ३७० रद्द झाल्यावर या केंद्रशासित प्रदेशात दहशतवादाला आळा बसल्याचे जाणवत होते, फुटीरवाद संपवण्यात यश आले आहे असे वाटत होते. परंतु आता पुन्हा एकवार हे वाद डोके वर काढत असल्याचे दिसून येत आहे. या भागावर भारताची पकड मजबूत होऊ नये यासाठी पाकिस्तानचे राजकारणी आणि लष्कर यांचा दहशतवादी मार्गाने काश्मीरवर पकड मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दहशतवाद हे जगासमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. दहशतवादामुळे जागतिक आणि प्रादेशिक शांतता धोक्यात आली आहे.

### रिल्सस्टारचा दरीत पडून मृत्यू

रायगड–जिल्ह्यातील माणगाव मधील कुंभे आणि देवकुंड हे धबधबे पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. येथे पावसाळ्यात असंख्य पर्यटक येत असतात. मुंबई येथील चार्टर्ड अकाउंटेंट असेलेली २७ वर्षीय तरुणी कु. आनवी कामदार ही आपल्या मित्र मैत्रिणींसोबत १६ जुलै रोजी समाजमाध्यमांवर प्रसिद्ध असलेल्या कुंभे येथील जीवघेण्या कड्यावर इंस्टाग्राम रील बनवण्यासाठी आली होती. परंतु तिचा हा प्रवास आणि रील हा दुर्दैवाने तिच्या जीवावर बेतून तिच्या जीवनाचा शेवटचा प्रवास ठरला आहे. रिल्स बनवताना अचानक तिचा पाय घसरला आणि ती ३०० फुट खोल दरीत पडली. त्यात तीचा मृत्यू झाला आहे.

# दूध दरासाठी मंत्री राधाकृष्ण विखेंच्या परराज्यातील दूध संघांना पायघड्या

## दूध प्रश्न सोडवण्यात सरकारला अपयश?

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात दुधाला दरवाढ द्यावी, या मागणीसाठी राज्यभर दूध उत्पादक आंदोलन करत आहेत. त्यात आता राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी परराज्यातील दूध संघांसाठी पायघड्या पसरल्या आहेत. मंत्री विखे यांनी दूध प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी अमूलसह परराज्यातील दूध संघांनी महाराष्ट्रातील अतिरीक्त २० लाख लिटर दुधाचे संकलन करावे, असे आवाहन केले आहे. तसेच दूध प्रक्रिया केंद्रांनी यासाठी सहकार्य केल्यास अतिरीक्त दुधाच्या प्रश्नासह दूध उत्पादकांना ३५ रूपये भावही देता येईल, असा दावा विखे यांनी केला आहे. मुंबईत दूध व्यवसायिक आणि दूध प्रक्रिया केंद्राच्या प्रमुखांच्या बैठकीदरम्यान मंत्री विखे बोलत होते.

राज्यातील दूध उत्पादक शेतकरी दुधाच्या पडणाऱ्या भावामुळे त्रस्त झाले आहेत. तर दुधाला अनुदान नको ४० रूपये दर द्या अशी मागणी करत आहेत. मात्र दूध प्रश्न सोडवण्यात मंत्री विखे यांना अपयश आले आहे. ◄◄ पान २ वर



### हमीभावाचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविला

दूध उत्पादकांच्या दुधाला हमीभाव मिळावा या मागणीची माहिती आणि तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवल्याची माहिती विखे यांनी यावेळी दिली. तर दुधाच्या हमीभावासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांची भेट घेतली असून यावर लवकरच धोरणात्मक निर्णय घेतला जाईल असा विश्वास विखे व्यक्त केला. यावेळी राज्यातील प्रक्रिया केंद्राना दूध भुकटीला अनुदान दिले जाते, तसेच परराज्यातील प्रक्रिया केंद्रानाही मिळावे, अशी मागणी उपस्थित परराज्यातील दूध प्रक्रिया केंद्रांनी केली. यावर विखे यांनी, या मागणीबाबत सरकार सकारात्मकतेने विचार करेल, असे आश्वासन दिले आहे.

# राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराला १५ दिवसानंतर मुहूर्त?

## मुख्यमंत्री म्हणतात, विस्तार लवकरच होईल; पंकजा मुंडेंना संधी मिळणार का?

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुक संपताच महिनाभरात राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचे म्हटले जात होते. मात्र दिड महिना झाले तरी अजून मंत्रिमंडळ विस्ताराला मुहुर्त सापडलेला नाही. तरी येत्या १५ दिवसानंतर विस्तार होणार असल्याची माहिती असून पंढरपुर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विस्तार लवकरच होणार असल्याचे सांगितले आहे. या विस्तारात भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना संधी दिली जाते का?





याकडे संपुर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

गेल्या पावने दोन वर्षापुर्वी राज्यात सत्तांतर झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांना शपथ घेण्यासाठी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला होता. त्यानंतर अद्याप विस्तार झालेला नाही. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर तात्काळ मंत्रिमंडळाचा केला जाईल असे म्हटले जात होते. मात्र दिड महिना झाला तरी विस्तार झालेला नाही. विस्तार कधी होईल आणि आपल्याला संधी कधी मिळेल यासाठी अनेकजण देव पाण्यात ठेवून आहेत. त्यातच पंढरपुर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचे सांगितल्यामुळे येत्या १५ दिवसात विस्तार होईल, असा अंदाज आहे.

भाजप नेत्या पंकजा मुंडे या नुकत्याच विधानपरिषद निवडणुकीत विजयी झाल्या आहेत. राज्यातील राजकीय परिस्थिती पाहता ओबीसी समाजाला मंत्रिमंडळात भाजपकडून स्थान दिले जाणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. त्यामुळे आ. पंकजा मुंडे यांना कॅबिनेट मंत्री पदाची शपथ या विस्तारात दिली जाणार असल्याची दाट शक्यता आहे. तसे झाले तर राज्यातील ओबीसी समाज विधानसभेला भाजपच्या पाठीशी ताकदीने राहू शकतो, असे म्हटले जात आहे.

### मराठवाड्यात दोन मंत्रिपद दिले जाणार

आ. पंकजा मुंडे यांना मंत्रीपदाची संधी मिळू शकते तर संभाजीनगर लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्याने शिवसेनेकडून खा. संदिपान भुमरे यांच्या जागी आ. संजय सिरसट यांना लॉटरी लागू शकते. तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून जालना किंवा परभणी जिल्हयाला संधी देत राज्यमंत्री म्हणून एकाला शपथ दिली जाण्याची शक्यता आहे.

## क्रॉस व्होटिंग करणाऱ्या काँग्रेसच्या 'त्या' सात आमदारांवर कारवाईचा बडगा?

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीत सात काँग्रेस आमदारांच्या क्रॉस व्होटिंगमुळे निर्माण झालेल्या नाराजीचा सूर दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. या संदर्भातील अहवाल राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी पक्षाचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांच्याकडे सोपवल्याचे समजते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी दोघेही सध्या दिल्लीत नसल्यामुळे कारवाई लांबण्याची शक्यता आहे. मात्र त्यांचा संदेश मिळाल्यास क्रॉस व्होटिंग करणाऱ्या सात आमदारावंर कारवाई होण्याची दाट शक्यता आहे. याचसंदर्भात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले सोमवारपासून दिल्लीत आहेत.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेस नेतृत्वाला आमदारांच्या क्रॉस व्होटिंगचे कारण जाणून घ्यायचे होते. क्रॉस व्होटींग करणाऱ्या आमदारांवर कडक कारवाई करण्याचे संकेत नाना पटोले यांनी आधीच दिले होते. क्रॉस व्होटिंग करणाऱ्यांची ओळख पटली असल्याचेही ते म्हणाले होते. दरम्यान, हायकमांड पक्षातील अंतर्गत वाद मिटवण्यासाठी काही कठोर निर्णय घेण्याची शक्यताही नाकारता येत नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालात महाराष्ट्रातील चांगल्या कामगिरीमुळे काँग्रेसचे मनोबल उंचावले आहे. त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व कोणत्याही प्रकारचा धोका पत्करू इच्छित नाही. मात्र लोकसभा निवडणुकीनंतर विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या सात आमदारांचे क्रॉस व्होटिंग झाल्याच्या घटनेने राज्यातील संघटनेत सर्व काही सुरळीत नसल्याचे संकेत दिले आहेत.

## एमआयएमने मोर्चा काढल्यास १९ जुलैला कोल्हापूर बंद – हिंदू संघटना

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

विशाळगड हिंसाचार प्रकरणी एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी कोल्हापुरात मोर्चा काढणार असल्याचे सांगितले आहे. मात्र, आता एमआयएमच्या कोल्हापुरातील मोर्चाला सकल हिंदू समाजाने कडाडून विरोध दर्शवला आहे. माजी खासदार इम्तियाज जलील जर कोल्हापुरात आले तर त्यांचे कोल्हापुरी पायताणाने स्वागत करू, या घटनेविरोधात एमआयएमने कोल्हापुरात मोर्चा काढल्यास १९ जुलैला सकल हिंदू समाजाच्यावतीने कोल्हापूर बंदची हाक देण्यात येईल, असा इशारा हिंदू एकताचे जिल्हाध्यक्ष दीपक देसाई यांनी दिला आहे.

कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी कोल्हापुरातील एमआयएमच्या मोर्चाला परवानगी दिली जाऊ नये, याबाबत मी पोलिसांशी बोलणार असल्याचे म्हटले आहे. पोलिस याबाबत गाफील राहिले का याची देखील चौकशी करू, असे त्यांनी सांगितले. विशाळगड परिसरामध्ये यासीन भटकळ राहिल्याची चर्चा होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भटकळ कधी कोणाकडे राहिला होता याची चौकशी करणार असल्याचे मुश्रीफ यांनी म्हटले आहे. पोलिसांनी त्या संदर्भात काय भूमिका घेतली याबाबतही चौकशी करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, किल्ले विशाळगड अनाधिकृत अतिक्रमणाबाबत तणाव निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल करून सामाजिक अस्थिरता, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ◄◄ पान २ वर

## अग्निवीरांना सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

**हरियाणा सरकारची मोठी घोषणा**

हरियाणा सरकारने अग्निवीरांसाठी मोठी घोषणा केली आहे. पोलीस कॉन्स्टेबल, मायनिंग गार्ड, फॉरेस्ट गार्ड, जेल वॉर्डन आणि विशेष पोलीस अधिकारी या पदांसाठी अग्निवीरांना १० टक्के आरक्षण दिले जाईल, अशी घोषणा हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी बुधवारी केली.

मुख्यमंत्री नायबसिंग सैनी म्हणाले की, आमचे सरकार अग्निवीरांना १० टक्के आरक्षण देईल. अग्निवीर ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोककल्याणकारी योजना आहे. राज्य सरकारच्या नोकरीत अग्निवीरला प्राधान्य दिले जाईल. ◄◄ पान २ वर

## कृषी विभागात १८० कोटींचा घोटाळा?

### सुप्रिया सुळेंचा सरकारवर गंभीर आरोप


**पुणे । प्रतिनिधी**



खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपाच्या जनसंवाद यात्रेवरून बुधवारी (दि.१७) जोरदार टीका केली आहे. सुळे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या साप्ताहिक विवेकच्या संदर्भावरून कृषी विभागात १८० कोटींचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच भाजपने आपल्या जनसंवाद यात्रेतून जनतेला सहा प्रश्नांची उत्तरे द्यावीत असे आव्हान दिले आहे.

यावेळी सुळे यांनी, भाजपने भ्रष्टाचार आणि ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्यांचे काय झाले? यावर बोलावे. दूध, कांदा, हमीभाव आणि महागाईच्या मुद्द्यावर भाजपची भूमिका काय? तसेच राज्याने काढलेल्या कर्ज, अर्थसंकल्पातील घोषणांवर खर्च करण्यासाठी पैसा आहे का यावर देखील भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली आहे. तर "बेरोजगारीवर भाजप आणि सरकारची नेमकी भूमिका काय? यावर भाजपने बोलावे. त्यांना जमत नसेल तर मित्र पक्षांनीही याबाबत बोलावं अशी मागणी सुळे यांनी केली आहे. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक ◄◄ पान २ वर

## पोलिस बंदोबस्तात शिवरायांची वाघनखं साताऱ्यात; उदयनराजे यांनी केले स्वागत



**सातारा । प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राला गेल्या काही महिन्यांपासून उत्सुकता लागलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक वाघनखांचे महाराष्ट्राची राजधानी मुंबईत स्वागत करण्यात आले. त्यानंतर, स्वराज्याची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या सातारा जिल्ह्यात आता ही वाघनखे नेण्यात आली आहेत. लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममधून ही वाघनखे तीन वर्षांसाठी भारतात आणली असून, साताऱ्यातील संग्रहालयात पुढील दहा महिने ही वाघनखे इतिहासप्रेमींसह सर्व नागरिकांना पाहता येणार आहेत.

हिंदुस्थानच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अजरामर असून कित्येक पिढ्यांसाठी हा प्रेरणादायी ठेवा आहे. महाराष्ट्रातील गड–किल्ले आणि ऐतिहासिक वास्तू आजही १६ व्या शतकातील मराठ्यांच्या शौर्याची आणि किर्तीची साक्ष देत आहेत. त्यापैकीच एक असेलल्या शिवरायांच्या वाघनखांचे बुधवारी लंडनहून भारतात आगमन झाले. ऐतिहासिक प्रतापगडावर अफजलखानाचा कोथळा काढलेली ◄◄ पान २ वर

### चार शहरांत करणार प्रदर्शित

ही वाघनखं सातारा, कोल्हापूर, मुंबई आणि नागपूर या ४ शहरात प्रदर्शित केली जाणार असल्याचे सध्या ठरलक आहे. मात्र, याचे नियोजित वेळापत्रक अजून ठरलेले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसमवेत बोलून हे वेळापत्रक निश्चित केले जाणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

### १९ तारखेला मुख्यमंत्र्यांच्याहस्ते उद्घाटन

शुक्रवारी सकाळी ११ वाजता सातारा येथे वाघनखं आणि इतर शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात येईल, या उद्घाटन सोहळ्याला मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि स्वतः सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार हे उपस्थित राहतील. याच कार्यक्रमात प्रतापगड विकास प्राधिकरणाची घोषणा केली जाईल, मुख्यमंत्री याची घोषणा करतील, अशी माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.०० क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२९७ |
| ज्वारी/हायब्रिड : ५४.०० क्विंटल | २,११५ | २,९७० | २,३५९ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,८०१ | ८,८०१ | ८,८०१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: ४२.०० क्विंटल | २,४४० | ३,२५५ | २,७२१ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १५.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,३७६ | ६,५०१ | ६,४२४ |

# राज्यात उत्तम पाऊस पडू दे ! मुख्यमंत्री शिंदे यांचे विठ्ठलाकडे साकडे

## सटाणा तालुक्यातील शेतकरी अहिरे दाम्पत्य शासकीय पुजेचे मानकरी

**पंढरपूर । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरच्या विठ्ठल रखुमाई मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते विठ्ठलाची शासकीय पूजा संपन्न झाली. यंदा नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील शेतकरी बाळू शंकर अहिरे आणि आशाबाई बाळू अहिरे यांना मानाचे वारकरी म्हणून शासकीय पूजेला बसण्याचा मान मिळाला. त्यांच्यासोबत पूजा करणे हे आपले सौभाग्य असल्याचे मत मुख्यमंत्री शिंदे यांनी या पूजेनंतर व्यक्त केले.



आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरचे वातावरण भक्तीमय झालेले आहे, सर्वजण पांडुरंगाच्या भक्तीमध्ये भान हरपून गेलेले आहेत. हे बा विठ्ठला माझ्या बळीराजाला सुखी ठेव, कष्टकऱ्यांच्या व सामान्यांच्या जीवनात समृद्धी येऊ दे, प्रत्येकाचे दुःख दूर कर, असे साकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विठ्ठलाच्या चरणी घातले.

आषाढी एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची महापूजा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक केली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ◄◄ पान २ वर

### मानाच्या वारकऱ्यांचा सन्मान

शेतकरी बाळू शंकर अहिरे, वय ५५ वर्षे, सौ. आशाबाई बाळू अहिरे वय ५० वर्षे. (मु. पो. अंबासन,ता.सटाणा जि. नाशिक) यांचा सन्मान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. यावेळी एसटी महामंडळाकडून मानाच्या वारकऱ्यांना एक वर्ष मोफत एसटी बस सवलत पास मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आला. हे मानाचे वारकरी मागील १६ वर्षापासून नियमितपणे वारी करीत आहेत.

### १२ लाख भाविकांची मांदियाळी

राज्याचे आराध्य दैवत श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचा आषाढी एकादशी सोहळा बुधवारी संपन्न झाला. हा नयनरम्य सोहळा 'याची देही याची डोळा' पाहण्यासाठी सुमारे बारा लाखाहून अधिक वारकरी भाविक संतांच्या पालख्यांसोबत हरिनामाच्या गजरात पंढरी नगरीत दाखल झाले होते. पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विठ्ठल–रुक्मिणीची महापूजा सपत्नीक पार पडली. देहभान विसरून विठ्ठला चरणी भाविक भक्त लीन झाले. मंदिर प्रथमच भाविकांना ७०० ते ८०० वर्षापूर्वी असलेले काळ्या पाषाणातील आणि कोरीव नक्षीकामात दिसत असून, पुरातन शैलीतील सावळ्या विठुरायाचे रूप अधिकच खुलून दिसत आहे. भूवैकुंठ पंढरीनगरीत दाखल झालेल्या भाविक भक्तांनी चंद्रभागेत पवित्र स्नान करून सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस पूर्ण केली. 'भेटीलागीं जीवा लागलीसे आस' 'पाहे रात्रीं दिवस वाट तुझी' अशी अवस्था भाविकांची यावेळी पाहावयास मिळाली. ही आस विठ्ठल दर्शनाने संपली असल्याची भावना व्यक्त झाली.

### श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने देण्यात येणारे श्री. विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देण्यात आले. संत तुकाराम महाराज वंशज देहूकर दिंडी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, देहू यांना एक लाखाचा प्रथम पुरस्कार मिळाला. दानेवाला निकम दिंडी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा, पुणे यांना ७५ हजार रुपयांचा द्वितीय पुरस्कार तर गुरु बाबासाहेब आजरेकर दिंडी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा, इंदापूर यांना ५० हजार रुपयांचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. या सर्व पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते करण्यात आले.

◄◄ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# काश्मीर पुन्हा अशांत ; जबाबदार कोण ?

अनुच्छेद ३७० रद्द झाल्यावर या केंद्रशासित प्रदेशात दहशतवादाला आळा बसल्याचे जाणवत होते, फुटीरवाद संपवण्यात यश आले आहे असे वाटत होते. परंतु आता पुन्हा एकवार हे वाद डोके वर काढत असल्याचे दिसून येत आहे. या भागावर भारताची पकड मजबूत होऊ नये यासाठी पाकिस्तानचे राजकारणी आणि लष्कर यांचा दहशतवादी मार्गाने काश्मीरवर पकड मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दहशतवाद हे जगासमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. दहशतवादामुळे जागतिक आणि प्रादेशिक शांतता धोक्यात आली आहे. दहशतवादी गुन्ह्यांचे सूत्रधार आणि वित्तपुरवठादार यांना शोधून त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची गरज आहे. जम्मू-काश्मीरमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी अतिरेकी सतत सुरक्षा पथकांना लक्ष्य करीत आहेत.

डोडा जिल्ह्यात लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये सोमवारी रात्री झालेल्या चकमकीत एका कॅप्टनसह एक पोलिस आणि चार जवान शहीद झाले. गत आठवडाभरात ११ भारतीय जवानांनी प्राण गमावले आहेत तर ९ दहशतवादी मारले गेले आहेत. या वाढत्या दहशतवादी कारवायांना सीमेपलीकडून खतपाणी घातले जात आहे. ६ जुलैला कुलगाम जिल्ह्यात दोन चकमकी झडल्या, त्यात ६ दहशतवाद्यांना ठार करण्यात आले तर दोन जवान शहीद झाले. १४ जुलैला कुपवाडा जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला होता. यात तीन दहशतवादी ठार झाले होते. कथुआ, उधमपूर, रियासी, डोडा, किश्तवाड, राजौरी आणि पूंछ जिल्ह्यात दहशतवाद्यांच्या कारवाया वाढल्या आहेत. या डोंगराळ भागातील नैसर्गिक गुहांमध्ये लपून बसलेल्या दहशतवाद्यांचा खात्मा करणे हे आव्हान आहे. याशिवाय आयएसआय कार्यकर्त्यांचा शोध घेण्यासाठी व्यापक मोहीम राबवावी लागणार आहे. जम्मू-काश्मीरच्या पुनर्रचनेपासून होत असलेले हल्ले चिंताजनक बनले आहेत. आयएसआय आणि त्यांचे एजंट दहशतवाद्यांना संवेदनशील भागात घुसवण्यास मदत करत आहेत. त्यांना रोखणे हे मोठे आव्हान आहे. सप्टेंबर २१ पासून दहशतवाद्यांनी जम्मू विभागात २१ हून अधिक हल्ले केले, यात ४३ लष्करी जवान शहीद झाले. काश्मीरमध्ये हिंसाचार सुरू झाल्यापासून पाकिस्तान आणि आयएसआय जम्मूला अशांत करण्यासाठी सातत्याने कट रचत आहेत. पाकिस्तानी दहशतवाद्यांना काश्मीरमध्ये घुसखोरी करण्यात जे यश मिळत आहे त्याला प्रादेशिक पक्ष कारणीभूत आहेत असा गंभीर आरोप जम्मू-काश्मीरचे पोलिस महासंचालक आर. आर. स्वेन यांनी केला आहे. राजकारणी लोक भारतीय सेनेद्वारा मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या घरी जाऊन सार्वजनिकपणे त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करतात. मतांसाठी दहशतवाद्यांना आश्रय दिला जातो असे आरोप स्वेन यांनी केले आहेत.

उंदीर जसे घरात घुसण्यासाठी बिळांचा वापर करतात तसे दहशतवादी सुद्धा भारतीय हद्दीत घुसण्यासाठी छोटे बोगदे तयार करतात. भारतात घुसण्याचे त्यांचे सर्व मार्ग आम्ही बंद करू असे स्वेन यांनी म्हटले आहे. डोडा जिल्ह्यात झालेल्या हल्ल्याची सरकारने गंभीर दखल घेतली असून या संदर्भात संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी भारतीय लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्याशी चर्चा केल्याचे सांगितले जाते. संरक्षणमंत्र्यांनी दहशतवादाविरोधात कारवाई करण्यास लष्करप्रमुखांना हिरवा कंदिल दाखविल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. डोडा भागात भारतीय लष्कर व दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत भारतीय जवान शहीद झाले. या घटनेबाबत जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी मोदी सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या म्हणाल्या, देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी जवान काश्मीरमध्ये येतात मात्र इथून परत जाते ते त्यांचे पार्थिव-तेही शवपेटीतून! मोदी सरकार म्हणतेय, काश्मीर खोऱ्यातला दहशतवाद संपलाय, मग काश्मीरमध्ये आपल्या जवानांना कोण मारतंय? या सर्व घटनांना कोण जबाबदार आहे? जम्मूत सध्या जे काही घडतेय त्याची जबाबदारी हे सरकार घेणार आहे का? गत ३२ महिन्यांपासून जम्मू-काश्मीर अशांत आहे. प्रामुख्याने नव्या पोलिस महासंचालकांची नियुक्ती झाल्यापासून येथील वातावरण दूषित झाले आहे. सध्याचे पोलिस महासंचालक केवळ राजकीयदृष्ट्या निर्णय घेत आहेत असा आरोप मेहबूबा मुफ्ती यांनी केला असून त्यांच्या बडतर्फीची मागणी केली आहे. सीमेवर काश्मिरी बांधव नाहीत, मुसलमान नाहीत, पत्रकार व व्यापारीही नाहीत. केंद्र सरकार व लष्कर देशाच्या सीमा सुरक्षित करतात मग देशात होणारी घुसखोरी रोखण्याची जबाबदारी कोणाची? ही स्थानिक सुरक्षा बलाची जबाबदारी नाही. मग जबाबदारी कोणाची याचे उत्तर कोण देणार? असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

# सहा हजार संवादकांच्या माध्यमातून जनजागृती-पाठक

## ‘ओला हिरवा सुका निळा’ अभियानाच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांचे सुतोवाच

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील १३५० गावांमध्ये गृहभेटीच्या माध्यमातून अतिसार थांबवा व स्वच्छतेचे दोन रंग ‘‘ओला हिरवा सुका निळा‘‘. या उपक्रमात कुजणारा व नको देणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी प्रत्येक गावामधून पाच संवादक या प्रमाणे जवळपास ६००० संवादकांच्या माध्यमातून जनजागृती करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली आहे.

जिल्हा परिषद सभागृहात ग्रीन लीफ पडताळणी बैठक व अतिसार थांबवा अभियान तसेच स्वच्छतेचे दोन रंग या जनजागृती उपक्रम शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संगितादेवी पाटील, उपविभागीय दंडाधिकारी कविता जाधव , प्रमोद कुदळे व तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गंडाळ , ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर मोकाटे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांच्यासोबत सर्व गटविकास अधिकारी सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी यांची उपस्थिती होती. दिनांक ८ जुलै ते ७ ऑगस्ट एक महिना कालावधीत जिल्हयातील प्रत्येक गावात अतिसार थांबवा, स्वच्छतेचे दोन रंग- ओला हिरवा, सुका निळा या नावाने अभियान राबविण्यात येत आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या उपक्रमातून पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत सुरक्षित करण्याची मोहीम याच अभियानामध्ये असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली



आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत राज्य माहे डिसेंबर २०२४ पर्यंत हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक गावात ५ संवादकाची निवड करण्यात येणार असून हे संवादक प्रत्येकाच्या घरी जावून संदेश देणार आहेत. यात सरपंच, उपसरंपच, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा पाणी गुरुदत्त तपासणीतील पाच कुशल महिला जलसुरक्षक यांच्या माध्यमातून अतिसार थांबवा उपक्रमाची जनजागृती व उपायोजना करणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील यांनी दिली आहे. ओला कचरा हिरव्या रंगाच्या डब्यात ठेवावा. तसेच सुका कचरा निळ्या रंगाच्या डब्यात ठेवण्यासंदर्भात तसेच नियमित शौचालयाचा वापर करणे, शास्त्रयुक्त पध्दतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, सुयोग्य मैला गाळ व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय आणि नियमित वापर आदि बाबत गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. भेटी दरम्यान गुगल लींकव्दारे भेट दिलेल्या कुटुंबाची फोटोसह माहिती शासनास पाठविणार आहे. असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी दिली आहे. गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील गावांचे प्रती कुटूंब पाच या प्रमाणे संवादक तयार करुन गृहभेटीचे आयोजन करावे. या कामी तालुक्यातील सर्व अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी संनियंत्रण करुन अंमलबजावधी करावी. दर आठवडयाला या अभियानाचा जिल्हास्तरावरुन आढावा घेण्यात येणार असल्याची माहिती ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर ज्ञानोबा मोकाटे यांनी दिली आहे. कार्यशाळेत सर्व विषयाचे सादरीकरण श्री संजय मिसाळ व भारत नागरगोजे व अमोल कुलकर्णी यांनी केले. तर कार्यशाळेसाठी आरोग्य व ग्रामपंचायत विभागाचे विस्तार अधिकारी ,बाल विकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांचा १९ जुलै रोजी बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**



शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशावरून बीड जिल्हा संपर्कप्रमुख पदी मा.परशुराम जाधव साहेब यांची नियुक्ती झाल्यानंतर नवनियुक्त संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब युवा सेना प्रमुख माननीय आदित्य ठाकरे साहेब शिवसेना विभागीय नेते आमदार सुनीलजी प्रभु साहेब मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १९ जुलै २०२४ रोजी प्रथमच बीड जिल्हा दौ-यावर येत आहेत . सदरील दौऱ्यात बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल यशोदा येथे दुपारी १२:०० वाजता बीड जिल्हा शिवसेना महिला आघाडी युवा सेना व अंगीकृत संघटना पदाधिका-याची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली आहे तरी बैठकीला माजी मंत्री सहसंपर्कप्रमुख बदाम आबा पंडीत, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे सर,सह बाळासाहेब अंबुरे साहेब, सह संपर्क प्रमुख लक्षराज सानप साहेब उपस्थित राहणार आहेत तसेच बैठकीत संघटनात्मक बांधणी व विधानसभानिहाय पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात येणार आहे तरी सदरील बैठकीला बीड जिल्ह्यातील शिवसेना महिला आघाडी व अंगीकृत संघटनांचे आजी माजी पदाधिकार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, जिल्हाप्रमुख प्रमुख गणेश भाऊ वरेकर,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी केले आहे.

# विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नावाखाली दंगली घडवण्याचे षडयंत्र – नाना पटोले यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राजर्षि शाहू महाराज यांनी सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन राज्य केले म्हणूनच त्यांना लोकराजे म्हणतात. पण त्यांच्याच करवीर नगरीत सामाजिक सलोखा बिघडवण्याचे पाप केले जात आहे आणि तेही केवळ राजकीय फायद्यासाठी, हे अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक आहे. विशाळगड हिंसाचाराचे प्रकरण हे महाराष्ट्राला काळिमा फासणारे आहे, अशी घणाघाती टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

विशाळगड प्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले आहे. विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नावाखाली गजापूर गावात एकाच धर्माच्या लोकांवर हल्ले करून त्यांच्या घरांची, दुकानांची व मालमत्तांचे प्रचंड नुकसान करण्यात आले. झुंडशाहीचा हा प्रकार महाराष्ट्राला शोभणारा नाही, या दंगेखोरांच्या तात्काळ मुसक्या आवळा व कठोर कारवाई करावी, अशी मागणी नाना पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून केली आहे. विशाळगड प्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, महाराष्ट्र ही साधू-संतांची, थोर पुरुषांची, विचारवंत व समाजसुधारकांची भूमी आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारे पुरोगामी राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आहे. पण गेल्या काही दिवसांपासून आपल्या राजकीय फायद्यासाठी सत्ताधारी पक्षातील काही नेते प्रक्षोभक वक्तव्ये करून राज्यात हिंदू-मुस्लिम तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जाणीवपूर्वक धार्मिक तेढ निर्माण करण्याचा हा प्रकार अत्यंत घातक व महाराष्ट्राच्या प्रतिमेला कलंक लावणारा आहे, असे नाना पटोले यांनी पत्रात म्हटले आहे.

विशाळगडावरील अतिक्रमणे काढली पाहिजेत याबाबत कुणाच्याही मनात दुमत नाही. आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा गड-किल्ल्यांचा वारसा जपला पाहिजे. अतिक्रमणाचे हे प्रकरण न्यायालयात गेलेले आहे, न्यायालयातील सुनावणीवेळी सरकारी वकील उपस्थित नसतात, सरकार पक्षाकडूनच वेळकाढूपणा केला जात असताना अचानक अशा काही हालचाली करून अतिक्रमणाचा मुद्दा चव्हाट्यावर आणला गेला. विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नावाखाली १४ तारखेला विशाळगडापासून ४ किलोमीटर दूर असलेल्या गजापूर गावातील एका धर्माच्या लोकांच्या घरांवर हल्ले करण्यात आले, मारहाण करण्यात आली. हा प्रकार माणुसकीला काळिमा फासणारा आहे. विशाळगडावरील अतिक्रमण व गजापूर गावातील दंगल हे दोन्ही वेगळे विषय आहेत, असे नाना पटोले यांनी या पत्रातून सांगितले आहे.

### प्रशासनाच्या पाठबळाने झालेला गुन्हा

या प्रकरणी गृहमंत्री फडणवीस यांनी केलेले विधान राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी वा दंगेखोरांवर कारवाई करण्यासंदर्भातील नसून विशिष्ट धर्माला भीती घालण्याचे व या प्रकरणाला वेगळा रंग देणारे आहे, गृहमंत्र्यांचे विधान हे एकप्रकारे दंगेखोरांना पाठीशी घालणारे आहे, आम्ही या विधानाचाही निषेध करतो. १४ जुलै रोजी जो हिंसाचार झाला ते सरकार आणि प्रशासनाचे फक्त अपयशच नाही तर प्रशासनाच्या पाठबळाने झालेला गुन्हा आहे, अशी टीका नाना पटोलेंनी पत्रातून केली आहे.

## पान १वरून...

### दूध दरासाठी मंत्री राधाकृष्ण

राज्य सरकोरने दूध संघांसाठी दूध खरेदीचा दर प्रतिलिटर ३५ रुपये दर निश्चित केला आहे. यामध्ये दूध संघांनी ३० रुपये दर दिल्यास राज्य सरकार ५ रुपये अनुदान देईल, अशी खुटी राज्य सरकारने मारून ठेवली आहे. निश्चित केलेल्या दराप्रमाणे राज्यातील दूध उत्पादकांना दर मिळावा, यासाठी मंत्री विखे यांनी मुंबईत बैठक बोलावली होती. या बैठकीला अमूल, पंचमहाल, युनियन, कैरा युनियन, वलसाड, सुमूल आणि भरुज येथील युनियनचे प्रतिनिधी आणि दूध व्यवसाय विकास विभागाचे आयुक्त प्रशांत मोहोड उपस्थित होते. मंत्री विखे यांनी राज्य सरकारने निश्चित केलेल्या ३-५ आणि ८-५ फॅट गुणवत्तेसाठी ३५ रूपये दर देण्याचे आवाहन दूध प्रक्रिया केंद्रांना केले. तर केंद्राना दर लागू करताना काही अडचणी आल्यास विभागामार्फत सोडवू, असेही आश्वासन दिले. विखे म्हणाले, ‘‘राज्यात सध्या अतिरिक्त दुधाचा प्रश्न असून तो सोडवणे गरजेचे आहे. हा प्रश्न मार्गी लागल्यास अतिरिक्त २० लाख लिटर दुधाचे संकलन होण्यास मदत मिळेल. यासाठीच राज्यातील दूध प्रक्रिया केंद्रांनी सहकार्य करायला हवे.‘‘ असे विखे म्हणाले.

### राज्यात उत्तम पाऊस

तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री डॉ तानाजी सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार श्रीकांत शिंदे, आ.समाधान आवतडे, सचिन कल्याणशेट्टी, भरत गोगावले, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, हे सरकार सर्वसामान्याचे आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात सुख समृद्धी येण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आजच्या दिवशी पांडुरंगाला एकच प्रार्थना आहे की, राज्यातील शेतकरी, कामगार व कष्टकरी सुखी झाला पाहिजे. यासाठी हे शासन सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, बेरोजगार तरुणांसाठी मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना आदी योजनांच्या माध्यमातून शासन सर्वसामान्यांचे जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा सर्वांच्या संमतीनेच केला जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिलीमितीच्या वतीने प्रतिवर्षी प्रकाशित करण्यात येणारे आरोग्यदुत या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवरांच्या हस्ते पार पडले. यावेळी मेगडंबरीसाठी दोन कोटी ४५ लाख रुपयाचे चांदी दान करणाऱ्या उद्योजक सुनील मोरगे यांचाही मुख्यमंत्र्यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. प्रारंभी आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी सौ. लता एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महापूजा पार पडली.

### कृषी विभागात १८०

संघाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या तक्रारीवरून सुळे यांनी टीका केली आहे. सुळे म्हणाल्या, संघाने फडणवीस यांच्याकडे कृषी विभागात घोटाळ्याची तक्रार केली ही गंभीर बाब आहे. याबाबत संघाच्या विवेक या साप्ताहिकात लेख आला आहे.

भाजपने जरूर जनसंवाद यात्रा काढावी. पण कधीतरी भाजपने खरे बोलावे असा टोला सुळे यांनी लगावला. तसेच जर या जनसवांद यात्रेत भाजपने खरे बोलल्यास आपण त्यांचे स्वागत करू असेही सुळे म्हणाल्या. तर भाजपला माझ्या सहा प्रश्नांची उत्तरे देणे जमत नसेल तर भाजपच्या मित्र पक्षांनी ती द्यावीत अशी मागणी सुळे यांनी केली.

### पोलिस बंदोबस्तात शिवरायांची

छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आता सातारा जिल्हा हद्दीत दाखल झाली आहेत. आयशर गाडीतून ही वाघनखे पोलीस बंदोबस्तात साताऱ्यात दाखल झाली. साताऱ्यात या वाघनखांच्या स्वागताला छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज उदयनराजे भोसले आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित राहिले. १९ तारखेला ढोल-ताशांच्या गजरात साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या संग्रहालयात सर्व सातारकरांना ही वाघनखे पाहाता येणार आहेत.

### एमआयएमने मोर्चा काढल्यास

त्यामुळे कोल्हापुरात कलम १६३ जारी करण्यात आले आहे. विशाळगडाच्या पायथ्याशी १४ जुलै गजापुरात प्रचंड हिंसाचार झाला होता. यामध्ये मोठ्या प्रमाणात नासधुस करण्यात आली होती. मोठ्या संख्येने जमलेल्या जमावाने घोषणाबाजी करत अचानक दगडफेक करुन सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करुन नुकसान केले होते.

### अग्निवीरांना सरकारी

पोलीस कॉन्स्टेबल, मायनिंग गार्ड, फॉरेस्ट गार्ड, जेल वॉर्डन आणि विशेष पोलीस अधिकारी या पदांसाठी अग्निवीरांना १० टक्के आरक्षण दिले जाईल. तसेच अग्निवीर जवानांच्या जखमींबाबत समितीचा तपास अहवाल पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या उपचारासाठी पैसे दिले जातील. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी म्हणाले की, आम्ही या अग्निवीरांना गट ब आणि क मधील सरकारी पदांसाठी विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत ३ वर्षांची सूट देणार आहोत. हरियाणामधील अग्निवीरांच्या पहिल्या बॅचसाठी ही वयोमर्यादा पाच वर्षांची असेल.

**५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज**

हरियाणा अग्निवीर सैनिकांना सरकारी थेट भरतीमध्ये सूट मिळेल आणि त्यासोबतच अग्निवीर सैनिकांना ५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज मिळेल. काँग्रेसने अग्निवीरबाबत खोटा प्रचार केला आहे. वाहतूक अपघात झाल्यास सरकार भरपाईही देईल. याशिवाय रस्ते अपघातात जखमी झालेल्या अग्निवीरांचा खर्चही सरकार करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अग्निवीरला कोणत्याही औद्योगिक युनिटने दरमहा ३० हजार रुपयांपेक्षा जास्त पगार दिल्यास आमचे सरकार त्या औद्योगिक युनिटला वर्षाला ६० हजार रुपये अनुदान देईल, अशीही घोषणा त्यांनी केली.

## पान ६ वरून...

### संकल्प विद्यामंदिर शाळेत

शाळेने कल्पकतेच्या जोरावरती हा डोलारा उभा केला आहे. तसेच सर्वांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.पालखीचे पूजन करून पालखीने शालेय परिसरातून मार्गक्रमण केले. पालखी सोहळ्यामध्ये सुंदर देखाव्याने परिसरातील सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. चिमुकल्या वारकऱ्यांनी ग्यानबा तुकाराम जय जय राम कृष्ण हरी माऊली माऊलीच्या नाम घोष यावेळी केला. या बाल वारकऱ्यांनी गोल रिंगण केले यावेळी रिंगणात फुगड्या खेळाचा आनंद चिमुकल्याने घेतला. इयत्ता सातवी व आठवी मधील विद्यार्थिनींनी माऊली माऊली या गीतावर उत्कृष्ट सादरीकरण केले.

बन्सीलाल नगर अंबाजोगाई येथील जागृत हनुमान व विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे दिंडीचा समारोप करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी मनसोक्त भोजनाचा आनंद घेतला.

मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर. एस. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राथमिक विभाग श्रीमती घाडगे पी. व्ही., माध्यमिक विभाग श्रीमती कुलकर्णी ए. व्ही., यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह स्कूल बस चालक यांनी परिश्रम घेतले.

### पत्रकार सुनील कावळे यांच्याकडून

सामाजिक उपक्रम समाजाला एक आदर्श असा वाढदिवस साजरा केला त्यांनी धारूर शहरातील गायकवाड गल्ली येथील तरुण दत्ता विभुते यांचा १ मार्च रोजी दोन चाकी वाहनावर अपघातात होऊन उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले होते. घरातील कर्ता माणूस गेल्याने विभुते कुटुंबियावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे हे लक्षात घेता पत्रकार सुनील कावळे यांनी आपल्या वाढदिवसावर होणारा खर्च टाळून विभुते कुटुंबाला आर्थिक चन चन जाणवत आहे याची जाण ठेवून आपल्या वाढदिवसानिमित्त दत्ता विभुते यांची १३ वर्षीय मुलीच्या नावे बँकेमध्ये दहा हजाराची एफडी जमा करून वाढदिवस साजरा केला. तसेच या विधवा महिलेला शासनाची मदत मिळवण्यासाठी तहसील कार्यालयात पाठपुरावा केला आहे. सुनील कावळे यांनी सामाजिक संदेश देऊन वाढदिवस साजरा केल्याने या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### न्यू व्हिजन पब्लिक

आनंद द्विगुणित झाला . या दिंडी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ’ चे पालक श्री बालाजी जोगदंड सपत्निक हजर होते . प्रमुख पाहुणे जोगदंड दांपत्य व शाळेचे प्राचार्य रेंजु आर चंद्रन यांना पालखी पूजनाचा मान मिळाला. शाळेतील सर्व शिक्षक वृंद या दिंडीत आणि वारीत विठ्ठल नामाचा गजर करत सहभागी झाले. या शालेय दिंडी सोहळ्यात सहभागी झालेले सर्व विद्यार्थी , शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांचे संस्थेचे सचिव श्री राजकिशोर मोदी कार्यकारी संचालक श्री संकेत मोदी मार्गदर्शक प्रा . वसंत चव्हाण , डॉ .डी.एच. थोरात प्राचार्य डॉ. बी .आय .खडकभावी , प्राचार्य रेंजू आर चंद्रन यांनी कौतुक करून व शुभेच्छा व्यक्त केल्या .

### शेतकऱ्यांनो, गायगोठे-

यात उन्नती होईल. त्यामुळे एक रुपया देखील लाच न देता आलेल्या सर्व पैशातून काम करून घ्यावे. रोहयोच्या योजना शेतकऱ्यांसाठी आहेत. आलेले पैसे किती दिवसात शेतकऱ्यांना द्यायचे, याचे नियम आहेत. जर मुदतीत पैसे दिले नाहीत, तर त्याचे व्याज अधिकाऱ्याच्या पगारातून वसूल करण्याचा नियम आहे. त्यामुळे वेळ लागू द्या, पण पैसा कोणाला देवू नका. जर कोणी लाच मागत असेल तर त्याची जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद यांच्याकडे तक्रार करा, असेही अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरूवार दि.१८ जुलै २०२४


## केज राखीव विधानसभा मतदार संघावर भारतीय काँग्रेस पक्षाचा दावा

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय काँग्रेस पक्षाची जिल्हास्तरीय आढावा बैठक दि १६ जुलै रोजी काँग्रेसचे जेष्ठ नेते तथा माजी मंत्री अशोकराव पाटी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी माजलगाव विधानसभा मतदार संघाचा रीतसर आढावा घेण्यात आला.केज विधानसभा राखीव व माजलगाव विधानसभा मतदार संघातून खासदार सौ.रजनीताई पाटील,माजी मंत्री अशोकराव पाटील व जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांचे जिल्ह्यातील अत्यंत विश्वासू मानले जाणारे जिल्हा काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी विधानसभा उमेदवारीचा फॉर्म राज्यभरात प्रभाव असणारे काँग्रेसचे जेष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख,ऍड.अनिल मुंडे,जिल्हा उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्याकडे सपूर्द केला.उमेदवारीची मागणी करत असताना, काँग्रेस पक्ष श्रेष्ठीना उद्देशून दत्ता कांबळे यांनी सांगितले की, जिल्हाभरातील समाज आपल्या माध्यमातून काँग्रेस पक्षाच्या पाठीशी असून, मागासवर्गीय समाजाला विधानसभा निवडणुकीत एक उमेदवारी देऊन सन्मान करण्यात यावा, असे झाल्यास जिल्ह्यातील सर्वस्तरातील समाजघटकास सामाजिक न्यायाची भावना जागृत होऊन, जिल्ह्यातील प्रत्येक मतदार संघात काँग्रेस पक्षाला मदत होईल.

# आता कार्तिकी एकादशीपर्यंत विवाहांना 'ब्रेक'

## विवाह ईच्छुकांना एक महिना वाट पहावी लागणार

पुणे : प्रतिनिधी

कार्तिकी एकादशीपासून आषाढी एकादशीपर्यंत विवाहाचा धुमधडाका सुरू होता. ११, १४ व १५ जुलैला शेवटच्या मोठ्या मुहूर्तावर विवाहाचा योग अनेकांनी साधून घेतला. आता आषाढी एकादशीपासून ते कार्तिकी एकादशीपर्यंत विवाहांना 'ब्रेक' लागणार आहे. राज्यात आषाढी एकादशीपासून विवाह सोहळे पूर्णपणे बंद होतात. कार्तिकी एकादशी तथा तुलसीविवाहापासून विवाहांचा श्रीगणेशा होईल.



गेल्या कार्तिकी एकादशीपासून आषाढी एकादशीपर्यंत ६१ विवाह मुहूर्त होते. मे महिन्यात गुरुचा अस्त होता. त्यामुळे नोकरदार वर्गाचा मोठा हिरमोड झाला. विवाहेच्छूंना ६१ तिथी साधताना मोठी धावपळ करावी लागली. या महिन्यात १६ जुलैपर्यंत प्रत्येक दिवस तिथी समजून विवाह ईच्छकांनी मुहूर्त साधून घेतला. खान्देशात आषाढी एकादशीपासून कार्तिकी एकादशीपर्यंत विवाहाचे मुहूर्त नसतात. या कालावधीला 'देव बसणे' किंवा 'देव झोपले' असे म्हटले जाते.

गेल्या वर्षी होत्या ६१ विवाह तिथी

आजपासून विवाहाच्या तिथी संपल्या आहेत. गेल्या वर्षभरात ६१ विवाह मुहूर्त होते. मेमध्ये गुरुचा अस्त होता. त्यामुळे नोकरदार विवाहेच्छूंचा हिरमोड झाला. आता त्यांचे लक्ष कार्तिकी एकादशीकडे राहणार आहे.

१३ नोव्हेंबरला पहिली तिथी

आषाढी एकादशीनंतर कार्तिकी एकादशी १२ नोव्हेंबरला आहे. १३ नोव्हेंबरला तुलसीविवाह आहे. १३ नोव्हेंबर हा पहिला विवाह मुहूर्त आहे. तोपर्यंत 'कुर्यात सदा मंगलम'ला ब्रेकच राहील.

## आषाढी एकादशीनिमित्त शिवसेनेकडून महाप्रसादाचे वाटप!

### जगताप, मुळूक यांच्याकडून आषाढी एकादशीच्या भाविकांना शुभेच्छा

बीड । प्रतिनिधी

आषाढी एकादशी हा उपवासाचा दिवस लक्षात घेऊन भाविकांसाठी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी एकादशीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड तथा सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड येथे महाप्रसादाचे आयोजन केले होते. यादरम्यान बीडमधील भक्त भाविकांना तीन क्विंटल साबुदाणा खिचडी आणि फळांचे वाटप करण्यात आले. काल सकाळी १०. वाजल्यापासून महाप्रसादाचे वाटप सुरु करण्यात आले होते. याप्रसंगी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येत महाप्रसादाचा लाभ घेतला. जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी स्वतः उपस्थित नागरिकांना फराळ वाटप केले. याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या बीडमधील भक्त भाविकांना अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान बीड शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



## थोडक्यात



### वारकऱ्यासह प्रवाशांनाही केळीचे वाटप

चौसाळा : चौसाळा ता बीड येथील स्थानिक पत्रकारणसह चौसाळाबस स्थानका वरील व्यापारी दुकानदार व ग्रामस्थ यांच्या वतीने बस स्थानका वरील बस मधील प्रवासी तसेच स्थानकातील वारकरी व बसचे चालक वाहक का सह आषाडी एकादशीचे औचित्य साधून केळीचे सर्व नागरिकाला वाटप करण्यात आले सदर केळी वाटपाचा कार्यक्रम स्थानिकच्या पत्रकारांच्या पुढाकाराणे करण्यात आला या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळून सर्व प्रवाशांनी व वारकर्यांनी केळीवाटपा बद्दल सम्मनधिताना धन्यवाद दिले या केलीवटपकार्यक्रमाला स्थानिकचे वाहतूक नियंत्रक कचरू बोबडे यांच्या सह पत्रकार एन टी वाघमारे.बळीराम राऊत. विकास सर्वज्ञ.संजय भिलारे. नितीन औताडे.किशोर ढोकणे.पंजाब वाघमारे.मन्मथ तोडकर. पिंटू काळे. सचिन तोडकर. अंकुश बोबडे.यांच्या सह इतर मान्यवर आवर्जून उपस्थित होते

### न्यू व्हीजन पब्लिक स्कूल मध्ये शिक्षकांचे प्रशिक्षण

अंबाजोगाई : श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हीजन पब्लिक स्कूल अंबाजोगाई या शाळेत बोर्डा अंतर्गत चे दोन दिवसांचे प्रशिक्षण संपन्न झाले. न्यू व्हीजन पब्लिक स्कूल ही शाळा सातत्याने प्रशिक्षणाचे आयोजन करते व एक सर्व गुणसंपन्न शिक्षक देण्याकडे लक्ष देऊन असते ; म्हणूनच सलग दोन दिवस शाळेत हे प्रशिक्षण पार पडले. ने आयोजित केलेल्या प्रशिक्षणात बीड जिल्ह्यातील आठ शाळेचे सुमारे ३६ शिक्षक प्रशिक्षणार्थी हजर होते. या प्रशिक्षणासाठी कडून ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल , बीड च्या प्राचार्या श्रीमती रश्मी व्ही अरोरा यांनी संसाधन व्यक्ती म्हणून काम पाहिले. त्यांनी स्कूल हेल्थ अँड वेलनेस या विषयावर प्रशिक्षण दिले . यामुळे शाळेचे आरोग्य आणि व्यवस्थापन कसे असावे हे प्रशिक्षणातून सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना समजले .प्रशिक्षणा साठी आलेले सर्व प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक यांचे संस्थेचे सचीव श्री राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक श्री संकेत मोदी मार्गदर्शक वसंत चव्हाण, डॉ. डी.एच. थोरात , डॉ. बी. आय. खडकभावी प्राचार्य रेंजू आर चंद्रण यांनी स्वागत करून शुभेच्छा व्यक्त केल्या .



# विभूते कुटुंबियांना १० हजार रुपयांची मदत

धारूर /प्रतिनिधी

शहरातील गायकवाड गल्ली येथील तरुण दत्ता विभुते यांचा अपघात होऊन दि.०१/०३/२४ रोजी निधन झाले होते घरातील कर्ता माणूस गेल्याने विभुते कुटुंबियावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे तसेच विभुते कुटुंबाला आर्थिक चन चन जाणवत आहे याची जाण ठेवून पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सुनील कावळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वायफळ खर्चाला फाटा देत नंदनी दत्ता विभोते या १३ वर्षीय मुलीच्या नावाने दहा हजार रुपयांची एकटी करून विभुते कुटुंबीयांना पूर्ण फुलाची पाकळी म्हणून आर्थिक मदत केली आहे त्यांच्या या निर्णयाने समाजासमोर एक आगळावेगळा आदर्श ठेवला आहे त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सध्या धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्याची क्रेज निर्माण झाली आहे लहान मुलापासून ते मोठ्या व्यक्तीपर्यंत सर्वांचेच वाढदिवस मोठे खर्च करून साजरी करण्यात येत आहेत अतिरेकी सजावट फुगे पुणे मेंबर त्या जाळणे फटाके वाजवणे बॅनर बाजी करून वाढदिवस साजरा करण्याची स्पर्धा सध्या पाहायला मिळत आहे मात्र या सर्व गोष्टींना फाटा देत सामाजिक आत्मभान कायम ठेवून सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्याची प्रथा पाढण्याची गरज आहे हीच बाब लक्षात घेऊन धारुर येथील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सुनील कावळे यांचा वाढदिवस १७ जुलै रोजी संपन्न झाला त्यांनी वाढदिवसाला इतरत्र होणारा खर्च टाळून सामाजिक उपक्रम समाजाला एक आदर्श असा वाढदिवस साजरा केला त्यांनी धारूर शहरातील गायकवाड गल्ली येथील तरुण दत्ता विभुते यांचा १ मार्च रोजी दोन चाकी वाहनावर अपघातात होऊन उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले होते. घरातील कर्ता माणूस गेल्याने विभुते कुटुंबियावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे हे लक्षात घेता पत्रकार सुनील कावळे यांनी आपल्या वाढदिवसावर होणारा खर्च टाळून विभुते कुटुंबाला आर्थिक चन चन जाणवत आहे याची जाण ठेवून आपल्या वाढदिवसानिमित्त दत्ता विभुते यांची १३ वर्षीय मुलीच्या नावे बँकेमध्ये दहा हजाराची एफडी जमा करून वाढदिवस साजरा केला. तसेच या विधवा महिलेला शासनाची मदत मिळवण्यासाठी तहसील कार्यालयात पाठपुरावा केला आहे. सुनील कावळे यांनी सामाजिक संदेश देऊन वाढदिवस साजरा केल्याने या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## केशवराज मंदिराकडे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना फराळाचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

येथील विधानसभेचे आमदार प्रकाश सोळंके आणि माजलगाव तालुक्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाच्या जनक मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे याही वर्षी केसापुरी येथील केशवराजाच्या पायी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी फराळ वाटप करण्यात आले.





दि १७ जुलै बुधवार रोजी आषाढी एकादशी निमित्त केशवराज मंदिर येथे श्री भगवान केशवराज यांच्या दर्शनासाठी आषाढी एकादशी निमित्त येणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव आणि जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग अँड जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमानाने फराळाचे वाटप करण्यात आले. भाविक भक्तांनी श्री केशव राजाच्या दर्शनासाठी एकच गर्दी केली होती आणि विठ्ठलाच्या नामघोषात सर्व भाविक मंत्रमुग्ध झाले होते.लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरि पतसंस्थचे सीईओ सुहास सोळंके,जिजामाता नर्सिंग कॉलेजचे प्रिन्सिपल विनोद कुमार,जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजचे प्रिन्सिपल के करुणाकरण, ऑफिस सुप्रीटेंडंट वाघ तसेच लोकनेते सुंदर रावजी सोळंके नागरी पतसंस्थेचे सर्व कर्मचारी, जिजामाता नर्सिंग कॉलेज आणि फिजिओथेरपी कॉलेजचे सर्व कर्मचारी या सर्वांनी आपली सेवा विठ्ठल भक्तांच्या चरणी अर्पण केली.

## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात वारकरी दिंडी

धारूर : आषाढी एकादशी निमित्त शहरातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र च्या विद्यार्थ्यांनी विविध साधू संतांच्या व वारकऱ्यांच्या वेशात शहरात दिंडी सोहळा काढला. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर संत तुकाराम संत नामदेव संत मुक्ताबाई संत जनाबाई आधी संतांच्या वेशभूषा करून सर्वांना आकर्षित केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मान्यवर व वारकऱ्यांच्याउपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी हरी नामाच्या गजरात फुगडी व पहिले रिंगण पार पडले व पालखी शहरामध्ये मार्गस्थ पुढे हनुमान चौकामध्ये बाल चिमुकल्यांच्या दिंडीचे दुसरे रिंगण पार पडले.. शेवटी बाल चिमुकल्यांचा वारकरी सोहळा आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला..

## विज्ञान प्रयोग कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी घेतले हसत खेळत धडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि. १६ ज केंद्रात शालेय विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय विज्ञानप्रयोग कार्यशाळा पार पडली. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगांचा खेळकर वातावरणाचा सहजपणे अनुभव घेतला. या कार्यकमासाठी जळगाव येथील विज्ञानसंवादक प्रा. दिलीप भारंबे आणि प्रा. आर ए पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनात श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळात इयत्ता ९ वी व १० वी सर्व विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगांचा अनुभव घेतला. भौतिकशास्त्रामध्ये जड वाटणाऱ्या अवघड जाणाऱ्या विविध संकल्पना साध्या प्रयोगातून खेळत खेळत सहजपणे समजावून घेतल्या.



या कार्यक्रमात प्रा दिलीप भारंबे यांनी प्रकाशाविषयीचे नियम, रिफ्लेक्शन, रिफ्रॅक्शन, टोटल इंटरनल रिफ्लेक्शन, ऑप्टिकल फायबर, सेंट्रलफोर्स , सेंट्रीफ्युगल फोर्स ,लेन्स लॉ, एलेक्ट्रोमॅग्नेटिक इंडक्शन, पॅरिस लॉ, इलेक्ट्रिक मोटर, विद्युत जनरेटर, आर्किमिडीज प्रिन्सिपल, मल्टिपल इमेजेस , इनफिनीट इमेजस, पृष्ठीय तणाव, सरफेस टेन्शन असे अनेकविध प्रयोग केले. अत्यंत साध्या वस्तू वापरून, कुठलंही मोजमापाचे साहित्य न वापरता त्यांनी हे प्रयोग केले. तसेच या प्रयोगांमधून समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोन कसा द्यावा, अंधश्रद्धा कशा दूर कराव्या समाजात हेही सांगितले. विज्ञानाचे नियम/तत्वज्ञान वापरून फसवणूक केल्या जाणाऱ्या गोष्टी याबाबत अवगत केले. तसेच जीवशास्त्रीय प्रयोग करताना प्रा आर ए पाटील सरांनी सुक्ष्मदर्शकाची रचना समजावून सांगत कांदयाच्या पेशीच्या स्लाइड कशा बनवाव्या याबाबत मार्गदर्शन केले.

त्यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी कांदयाच्या पापुद्रयातील वनस्पती पेशी सुक्ष्मदर्शकातून पाहण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देताना असे मत व्यक्त केले की अशा प्रकारची प्रयोग आम्ही यापूर्वी कधीही पाहिले नव्हते हे प्रयोग शिकताना पाहताना आम्हाला खूप आनंद वाटला खूप मज्जा आली आणि विज्ञान किती सोपे आहे हेही कळले. या कार्यशाळेसाठी योगेश्वरी संस्थेचे सहसचिव श्री भीमाशंकर शेटे, सहसचिव श्री लंकेश वैद्य कार्यकारिणी सदस्य श्री अभिजीत लोहीया तसेच शाळेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

# शिंदे यांचा कार्यकर्त्यांसह शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते निवृत्त कार्यकारी अभियंता इंजि एन डी शिंदे (नवनाथ ज्ञानोबा शिंदे) यांनी आज सकाळी दि १७ रोजी पुणे येथील मोदींबाग येथील शरद पवार यांच्या निवासस्थानी त्यांच्या सहकाऱ्यांसह शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. इंजि एन डी शिंदे यांनी पक्षात प्रवेश केल्यानंतर बीड जिल्ह्यातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या केज विधानसभा मतदारसंघात उमेदवारी देऊन निवडणूक लढविण्याची मागणी केली. याप्रसंगी शिंदे यांच्या सोबत त्यांचे अनेक सहकारी उपस्थित होते.

येणाऱ्या तीन ते चार महिन्यात राज्यात विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. त्यामुळे या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार देखील आपल्या सोयीच्या पक्षात जाहीर प्रवेश करून निवडणूक लढविण्यासाठी मतदारांच्या व वरीष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेतांना दिसून येत आहे. माजी कार्यकारी अभियंता एन डी शिंदे(नवनाथ ज्ञानोबा शिंदे)यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांची भेट घेऊन त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. त्याचबरोबर यांच्याकडे केज विधानसभेच्या उमेदवारीची मागणी केली आहे. शिंदे हे उच्च विद्या विभूषित असून त्यांनी ३६ वर्ष शासकीय सेव केली असून ते २०२०साली नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.



आपल्या ३६ वर्षाच्या कार्यकाळात २६ वर्ष बीड जिल्ह्यातच सेवा बजावली असल्याने त्यांचा बीड जिल्ह्यात दांडगा संपर्क निर्माण झाला आहे. त्यांना समाजसेवेचा ध्यास असल्याने आपल्या सेवकाळात देखील त्यांनी सामाजिक सेवेचा वसा सोडला नाही . राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून आपली समाजसेवा कार्यरत ठेवली होती. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा उपाध्याय म्हणून आजही ते काम पहात आहेत. त्याचबरोबर डॉ बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स या संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष म्हणून देखील अतिशय उत्तम असे काम केले आहे. यामुळे शिंदे यांचा बीड जिल्ह्यात विशेषतः केज मतदारसंघात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. आणि याच जन संपर्काचा फायदा मिळवून घेण्यासाठी इंजि एन डी शिंदे यांनी केज विधानसभेसठी आपणास उमेदवारी द्यावी अशी मागणी शरदचंद्र पवार यांच्या कडे केली आहे.शिंदे यांच्या पक्षप्रवेशामुळे केज मतदारसंघात एक चांगला उच्चविद्याविभूषित उमेदवार मतदारसंघाला लाभणार असल्याचे मतदारातून बोलल्या जात आहे. शरदचंद्र पवार यांच्या पक्षाला देखील शिंदे यांच्या पक्षप्रवेशामुळे मोठा फायदाच होणार असून नागरिकातूनही इंजि शिंदे यांना केज मतदार संघासाठी उमेदवारी द्यावी अशीही मागणी जोर धरू लागली आहे. इंजि एन डी शिंदे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेशामुळे त्यांचे सर्वस्तरातून स्वागत होऊन त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

### जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र १९६/२०२४**

**आशाबाई व इतर वि निरक**

मयताचे नाव अमोल पिता राजेभाउ भोसले रा. शिंगनवाडी ता.धारूर जि. बीड हे. दिनांक १५/०६/२०२४ रोजी मयत झाले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार १. आशाबाई भ्र राजेभाउ भोसले वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. शिंगणवाडी ता. धारूर जि. बीड २. राजेभाउ पिता शामराव भोसले वय ६० वर्षे, धंदा शेती रा. शिंगणवाडी ता. धारूर जि. बीड यांनी या न्यायालयास मयत अमोल पिता राजेभाउ भोसले रा.शिंगनवाडी ता.धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार १ ते २ सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अमोल पिता राजेभाउ भोसले रा. शिंगनवाडी ता.धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज दिनांक : १६/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख :०७/०८/२०२४**

स्वाक्षरित
धपाटे व्ही. व्ही.
क. लिपिक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, धारुर

# हिंगोलीत हळदीचा भाव पडला फिका!

## सोयाबीनलाही मिळेना भाव, शेतकऱ्यांमध्ये नाराजी



राज्याच्या बाजारात हिंगोलीच्या हळदीचा भाव फिका पडला असून सोयाबीन पाठोपाठ आता हळदीची क्विंटल मागे दरघसरण सुरूच आहे. एप्रिल व मे महिन्यात १६ ते १७ हजार रुपयांवर गेलेला हळदीचा भाव उतरला असून तो १३००० रुपयांवर आल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. राज्यात यंदा रेकॉर्ड ब्रेक हळदीची आवक व विक्री झाली. सांगली, हिंगोली, वसमत येथे बाजार समितीच्या बाहेर लांबच लांब वाहनांची रांग लागल्याचे दिसले. मात्र खरीप हंगामाच्या सुरुवातीला हळदीची आवक मंदावली असून लोकलसह राजापुरी हळद केवळ १३ हजारांवर विकली जात आहे. १८ ते १९ हजार रुपयांवर असणाऱ्या हळदीची वेगाने घसरण सुरू झाली असून आवकही मंदावल्याचे चित्र आहे.

हळदीची आवक मंदावली : मागील दोन दिवसात राज्यात एकूण ४७०० क्विंटल हळदीची आवक झाली. यावेळी मिळणाऱ्या सर्वसाधारण भाव हा १२ ते १४ हजारांवर असून हिंगोलीत लोकल हळदीला अवघे १२५०० प्रतिक्विंटल भाव मिळाल्याचे दिसून आले. मागील चार दिवसात हिंगोलीत हळदीची आवक मंदावली असून किमतीत चढउतार दिसून आला. बुधवारी लोकल हळदीची आवक १४५० क्विंटल होती. यावेळी सर्वसाधारण १२५०० ते १३००० रुपयांचा भाव हळदीला मिळाला. त्याआधीदेखील हळदीची आवक साधारणपणे ५१५ क्विंटल ते ८०० क्विंटलच्या मध्ये होती. तर मिळणार दर सर्वसाधारण १२ ते १४ हजारांपर्यंतच असल्याचे पणन विभागाने सांगितले. सोयाबीनचा भाव वाढणार कधी? : जिल्ह्यात सोयाबीनदराची ही कोंडी कायम असल्याचे दिसून येत असून सोयाबीन ने अजून ५००० चा पल्लाही गाठलेला नाही. गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्याने तसेच पिवळा मोझॅक प्रादुर्भाव झाल्याने जिल्ह्यातील सोयाबीन पिवळे पडले. काही दिवसात भाव वाढतील म्हणून शेतकऱ्यांनी सोयाबीन साठवणुकीला पसंती दिली. मात्र सहा सात महिन्यांनंतरही सोयाबीन दर कोंडी कायम असल्याचे दिसून येत आहे.

हळदीची विक्रमी आवक : यंदा हळदीची विक्रमी आवक झाल्याचे चित्र होते. हिंगोलीसह सांगली, वसमत, तसेच विदर्भातील वाशिम, यवतमाळ , वर्धा जिल्ह्यातूनही हळदीची आवक झाली होती. परंतू जुन महिन्याच्या सुरुवातीपासून हळदीच्या भावात घसरण सुरु झाली असून १६ ते १७ हजार रुपयांवर असणारे भाव आता १२ ते १३ हजारांवर आले आहेत.

## गोगलगायींचे एकात्मिक व्यवस्थापन

जुलै महिन्याचा दुसरा पंधरवाडा गोगलगायीद्वारे अंडी टाकण्याचा राहणार आहे. जुलै महिन्याचा पहिला पंधरवाडा गोगलगायीच्या प्रभावी नियंत्रणासाठी निर्णायक राहणार आहे. त्यामुळे पहिल्या पंधरवाड्यातच सर्व शेतकऱ्यांनी मोहीम स्वरूपात गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषि विभाग व कृषि विद्यापीठाने केले आहे.

सर्वसाधारण गोगलगायी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जमिनीखाली सुप्तावस्थेत जातात आणि जून महिन्यात चांगला पाऊस होताच त्या सुप्तावस्थेतून बाहेर येऊन जमिनीच्यावर येतात. मागीलवर्षी सुप्तावस्थेत गेलेल्या गोगलगायी चालू वर्षातील जून महिन्याच्या शेवटच्या आठवडयात झालेल्या पावसानंतर सुप्तावस्था संपवून जमिनीच्या वर आलेल्या आहेत.

सध्या मागीलवर्षी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे दुबार पेरणी कराव्या लागलेल्या क्षेत्रामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव जास्त आढळून येत आहे. सुप्तावस्था संपवून जमिनीवर आलेल्या गोगलगायी पहिल्या पंधरा दिवसात समान आकाराच्या गोगलगायीशी संग करून पंधरा दिवसानंतर जमिनीच्याखाली प्रत्येक गोगलगाय १०० ते १५० अंडी टाकणार आहे. या अंड्याद्वारे गोगलगायीची पुढील वर्षाची पिढी तयार होणार आहे. त्यामुळे अंडी टाकण्याच्या अगोदर जर आपण गोगलगायीचे नियंत्रण केले तर चालू हंगामातील सोयाबीन पिकाबरोबरच पुढील वर्षातील सोयाबीन पिकाचे संरक्षण होण्यास मदत होणार आहे, असे सोयाबीन अभ्यासक डॉ.अरुण गुट्टे यांनी सांगितले. गोगलगायी सोयाबीन पिकाचे रोपावस्थेत मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. त्यामुळे रोपावस्थापूर्वीच गोगलगायीचे नियंत्रण करणे आवशयक आहे. सध्या सुप्तावस्थेतून बाहेर आलेल्या गोगलगायी दररोज सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान बांधाच्या बाजूने आढळून येत आहेत. त्यामुळे गोगलगायीच्या प्रभावी नियंत्रणासाठी गावातील सर्व शेतकऱ्यांनी मोहीम स्वरुपात सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान शेतात जाऊन जमिनीच्या वर आलेल्या गोगलगायी गोळा कराव्यात. गोळा केलेल्या गोगलगायी कुठेही न टाकून देता साबणाच्या किंवा मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात किंवा गोळा केलेल्या गोगलगायींवर मीठ किंवा चुन्याची भुकटी टाकावी, असा सल्ला डॉ.गुट्टे यांनी दिला आहे. सुतळीचे बारदाने गुळाच्या पाण्यात भिजवून आदल्या दिवशी बांधाच्या बाजूने रॅन्डम पद्धतीने टाकावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी बारदान्याखाली जमा झालेल्या गोगलगायी गोळा करून मिठाच्या अथवा साबणाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. गोगलगायी गोळा करताना हातात हातमोजे घालणे आवश्यक आहे, असेही डॉक्टर सांगतात.



## शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे आणि उपाययोजना



शेतीला जोडधंदा म्हणून शेळीपालन व्यवसाय केला जातो. जर आपण शेळीपालन व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्या पासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. परंतु बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो.

शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे-

शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळ्यांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळयांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते. या समस्येवर उपाय म्हणून शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. अजून एक महत्वाचे कारण म्हणजे जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्या मुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित राहावे लागते. या समस्येवर उपाय म्हणून वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परीक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. एवढेच नाही तर हार्ड स्टेनिंग हार्ड ड्राफ्टिंग, जबडा सुजणे हेदेखील वजन कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत. या समस्येचे निदान करायचे असेल तर शेळ्यांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी.

काही सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता

कोपर,कोबाल्ट आणि सेलेनियम या आवश्यक सूक्ष्म पोषकघटकांच्या कमतरतेमुळे किंवा असंतुलनामुळे देखील शेळ्यांमध्ये वजन कमी होऊ शकते. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते. या समस्येला श्वेत स्नायू रोग म्हणतात. या समस्येवर उपाय म्हणून जनावरांना खनिज मिश्रण पावडर दिले गेले पाहिजे. यासोबत जोन्स रोग मेंढी आणि शेळ्यांमधील जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते,अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात.

शेळ्यांमधील लंगडेपणा

शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो.

## उसावरील लोकरी मावा नियंत्रण



ऊस पिकातील लोकरी मावा या विषयी सविस्तरपणे माहिती असल्यास यावर नियंत्रण ठेवणे सोपे जाते. यामध्ये लोकरी मावा नेमका काय आहे, त्याचा प्रादुर्भाव कशामुळे होतो, त्याचा प्रसार कसा होतो, त्याची लक्षणे काय आहेत आणि लोकरी माव्याच्या रासायनिक नियंत्रणासाठी काय उपाययोजना करायला हव्यात याबद्दल माहिती घेणे आवश्यक आहे.

किडींची ओळख : १) मादीच्या पोटातून नुकतीच बाहेर पडलेली बाल्यावस्थेतील पिल्ले ही पिवळसर किंवा हिरवट पिवळसर रंगाची असून, अतिशय चपळ असतात.

२) बाल्यावस्था मध्ये चार वेळा कात टाकली जाते. ३) तिसऱ्या अवस्थेपासून किडीच्या पाठीवर पांढऱ्या लोकरी सारखे तंतू दिसून येतात. ४) लोकरी माव्याचे प्रौढ हे काळे असून, पारदर्शक पंखाच्या दोन जोड्या असतात.

१) किडीच्या पिले आणि प्रौढ अशा दोन अवस्था आहेत. २) पिले अवस्था आणि प्रौढ अवस्था सर्वांत जास्त नुकसानकारक असते. ३) एक मादी साधारण १५ ते ३५ किंवा त्यापेक्षा जास्त पिल्लांना जन्म देऊ शकते.

प्रसार : १) किडीचा प्रसार वाऱ्यामार्फत बाधित शेतातून तसेच ऊस वाहतुकीद्वारे होतो. २) किडीचा प्रादुर्भाव पावसाळ्यानंतर लगेच सुरू होतो. ३) उन्हाळ्यात, जास्त सापेक्ष आर्द्रता आणि दीर्घकाळ कोरड्या वातावरणात ही कीड जास्त कार्यक्षम असते.

उसावरील लोकरी मावा ची लक्षण : १) शेतकरी मित्रांनो, ऊस पिकावरील लोकरी मावा कीड ही एक रसशोषक कीड आहे. २) प्रादुर्भाव ग्रस्त पानावर तुम्हाला पिवळे ठिपके पडलेले दिसतील. ३) जास्त प्रादुर्भाव नंतर ऊसाचे संपूर्ण पान वाळून जाते. ४) परिणाम ऊसाचे वजन कमी भरते व साखरेचे प्रमाण देखील खूप कमी होते. ५) लोकरी मावा ही कीड तिच्या अंगामधून एक मधासारखा द्रव सोडत असल्यामुळे त्याच्यावर बुरशीची वाढ होऊन संपूर्ण पान नंतर काळे पडलेले दिसून येते.

घ्यावयाची काळजी : १) कीडग्रस्त भागात उसाची पट्टा अथवा रुंद सरी पद्धतीने लागवड करावी. २) प्रादुर्भाव झाल्यानंतर नियंत्रणाचे उपाय करणे सोपे होते. २) कीडग्रस्त ऊस बेण्यासाठी वापरू नये. बेणे निवडून झाल्यानंतर उसाची पाने जाळून टाकावीत. ३) ऊस लागवडीपूर्वी बेणे प्रक्रिया करावी. ४) मॅलाथिऑन ३ मि.ली. प्रति लिटर पाणी या द्रावणाण्ध्ये बेणे १५ मिनिटे बुडवून घ्यावे. ५) रासायनिक खताचा संतुलीत वापर करावा. ६) नत्रयुक्त खतांचा वापर जास्त प्रमाणात केल्यास किडीला प्रोत्साहन मिळते. ७) मावाग्रस्त उसाची हिरवी अथवा कोरडी पाने एका शेतातून दुसऱ्या शेतात किंवा एका भागातून दुसऱ्या भागात नेऊ नयेत.

जैविक उपाय : १) कोनोबाथ्रा ॲफिडीव्हारा १००० अळया किंवा मायक्रोमस इगोरोटास २५०० अळया किंवा क्रायसोपर्ला कार्निया या मित्रकीटकांची २५०० अंडी प्रति हेक्टरी सोडाव्यात. २) क्रायसोपर्ला कार्निया हा परभक्षक मित्रकीटक मऊ शरीराच्या किडीवर उपजीविका करतो. ३) मित्र किटक शेतात सोडल्यानंतर किटकनाशकाची फवारणी ३ ते ४ आठवडे करू नये. ४) कडूनिंब आधारित किटकनाशक ॲझाडिरॅक्टीन (५ टक्के) ३७५ मि.ली. प्रति ७५० लिटर पाणी या प्रमाणे प्रति हेक्टरी फवारणी करावी. ५) उसात किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास व त्याच्या नियंत्रणासाठी किटकनाशकांचा वापर केलेला असल्यास त्यानंतर १५ दिवसांनी परभक्षक कीटक सोडावे. ६) परभक्षक कीटकाच्या अळ्या किडीस नष्ट करतात. ७) प्रादुर्भावग्रस्त उसात फक्त परभक्षक सोडल्यास कीड नियंत्रण त्वरित होते.

रासायनिक उपाय : १) क्लोरपायरीफॉस (२० टक्के इ.सी.) यूपीएल कंपनीचे क्लोरोबॅन किंवा कोरोमंडल कंपनीचे त्रिशूल किंवा टाटा कंपनीचे ताफाबॅन किंवा क्रिस्टल कंपनीचे कमन. वापरण्याचे प्रमाण – ०.७५ ते १.५ मि.लि. २) डायमिथोएट (३० टक्के ईसी) युपीएल कंपनीचे नुगॉर किंवा स्वाल कंपनीचे तारा ९०९ किंवा टाटा कंपनीचे टॅफगॉर किंवा एन ए सी एल कंपनीचे क्रॉप डायमंड. वापरण्याचे प्रमाण – १.५ मिलि प्रति लिटर पाण्यात स्टिकर सह मिसळून फवारणी घ्यावी.

टीप : मोठ्या उसात गटूर किंवा पावर पंप वापरुन फवारणी करावी. त्यामुळे कीटकनाशकाचे द्रावण जास्त दाबाने फवारले जाऊन किड त्वरित मरते. द्रावणास चिकटपणा येण्यासाठी उत्तम दर्जाचे चिकट द्रव्य १ मिली प्रति लिटर द्रावणामध्ये मिसळावी.




### महत्वाच्या घटना

६४ई.पुर्व : रोममध्ये भीषण आग लागुन जवळजवळ सगळे शहर भस्मसात झाले. यादरम्यान सम्राट निरो लांब उभा राहुन आपले फिडल (तुणतुणे) वाजवत असल्याची कथा प्रसिद्ध आहे.
१८५२ : इंग्लंडमधे निवडणुकांत गुप्त मतदान वापरण्यास सुरूवात झाली.
१८५७ : मुंबई विद्यापीठाची स्थापना
१८७२ : ब्रिटन मध्ये निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा अधिनियम लागू करण्यात आला. यापूर्वी खुल्या प्रकारे मतदान केलं जात असे.
१९१४ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिका सोडले.
१९२५ : ॲडॉल्फ हिटलरने 'माइन काम्फ' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रकाशित केले.
१९६८ : सांता क्लारा, कॅलिफोर्निया येथे 'इंटेल'कंपनीची स्थापना
१९७६ : मॉन्ट्रिअल ऑलिंपिक खेळात नादिया कोमानेसीने जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत सर्वप्रथम १० पैकी १० गुण मिळवले.
१९८० : भारताने 'एस. एल. व्ही. ३' या अवकाशयानाद्वारे रोहिणी-१ या उपग्रहाचे अंतराळात यशस्वी प्रक्षेपण केले. या यशामुळे भारत हा उपग्रह सोडण्याची क्षमता असलेला जगातील सहावा देश बनला.
१९९६ : 'तामिळ टायगर्स'नी श्रीलंकेचा सैनिक तळ ताब्यात घेऊन सुमारे १२०० जवानांना ठार केले.
१९९६ : उद्योगपती गोदरेज यांना जपान सरकारतर्फे 'ऑर्डर ऑफ द रायझिंग सन' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३५ : रॉबर्ट हूक इंग्लिश वैज्ञानिक (मृत्यू: ३ मार्च १७०३)
१८४८ : डब्ल्यू. जी. ग्रेस इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: २३ आक्टोबर १९१५)
१८४८ : इंग्लिश क्रिकेटपटू डब्ल्यू. जी. ग्रेस यांचा जन्म. (मृत्यू: २३ ऑक्टोबर १९१५)
१९०९ : भारतीय कवी, समीक्षक आणि शैक्षणिक बिश्नु डे यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १९८३)
१९१० : भारतीय उद्योजिका दर्पेद प्रमानिक यांचा जन्म. (मृत्यू: १५ डिसेंबर १९८९)
१९१८ : नेल्सन मंडेला तथा 'मदीबा' दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ६ डिसेंबर २०१३)
१९२७ : 'गझलसम्राट' मेहदी हसन पाकिस्तानी गझलगायक (मृत्यू: १३ जून २०१२)
१९३५ : जयेन्द्र सरस्वती ६९ वे शंकराचार्य
१९५० : व्हर्जिन ग्रुपचे स्थापक रिचर्ड ब्रॅन्सन यांचा जन्म.
१९७१ : भारतीय गायक-गीतकार आणि अभिनेता सुखविंदर सिंग यांचा जन्म.
१९७२ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (मृत्यू: १७ एप्रिल २००४)
१९८२ : प्रियांका चोप्रा मॉडेल, अभिनेत्री, गायिका आणि 'मिस वर्ल्ड २०००' विजेती

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१७ : इंग्लिश लेखिका जेन ऑस्टीन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७५)
१८९२ : थॉमस कूक पर्यटन व्यवस्थापक (जन्म: २२ नोव्हेंबर १८०८)
१९६९ : 'लोकशाहीर' अण्णाभाऊ साठे लेखक, कवी व समाजसुधारक (जन्म: १ ऑगस्ट १९२०)
१९८९ : डॉ. गोविन्द केशव भट भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे संचालक, मराठी, संस्कृत व इंग्रजी लेखक (जन्म: )
१९९४ : डॉ. मुनीस रझा ख्यातनाम शिक्षणतज्ञ, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म:)
२००१ : पद्मिनीराजे माधवराव पटवर्धन सांगलीच्या राजमाता (जन्म:)
२००१ : रॉय गिलख्रिस्ट कसोटी क्रिकेटमधील भेदक वेगवान गोलंदाज म्हणून कारकीर्द गाजवलेले वेस्ट इंडीजचे वादग्रस्त कसोटीपटू (जन्म: २८ जून १९३४)
२०१२ : राजेश खन्ना चित्रपट अभिनेते, निर्माते आणि लोकसभा सदस्य (जन्म: २९ डिसेंबर १९४२)
२०१३ : भारतीय कवी, गीतकार, आणि अभिनेते वाली यांचे निधन. (जन्म: २९ ऑक्टोबर १९३१)
२०१७ : सुप्रसिद्ध भारतीय कवी, संस्कारकार, कथाकार, उपन्यासकार आणि सहृदय समीक्षक अजित शंकर चौधरी यांचे निधन.

## मराठवाड्यातील 'तेरणा' साखर कारखान्याने दिला उसाला सर्वाधिक दर

धाराशीव : यावर्षी उसाला सर्वाधिक दर मराठवाड्यातील सर्वात जुन्या तेरणा शेतकरी साखर कारखान्याने यंदाच्या गळीत हंगामात जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर शेतकऱ्यांना दिला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील भैरवनाथ शुगर्स यूनिट क्रमांक ६ संचलित येथील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने सन २०२३-२४ या हंगामातील उसाला जिल्ह्यात सर्वाधिक २ हजार ८२५ भाव दिला. ऊस पुरवठादार शेतकर्यांच्या खात्यात ऊस बिलाची ही रक्कम जमाही करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत यांनी दिली. मराठवाड्यातील पहिला व महाराष्ट्रातील दुसरा सहकारी साखर कारखाना असलेला ढोकी येथील तेरणा कारखाना मागील बारा वर्षांपासून बंद होता. कारखाना सुरू व्हावा यासाठी ढोकी व परिसरातील शेतकरी, कारखान्याचे सभासद, व्यापारी, कामगार यांनी तेरणा संघर्ष समिती स्थापना करून कोरोना काळात आंदोलने केली. यानंतर बँक प्रशासनाने हा कारखाना भाडे तत्त्वावर देण्याचा निर्णय घेतला. यानुसार राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी भैरवनाथ शुगर्सकडे २५ वर्षे भाडे तत्त्वावर हा कारखाना चालवण्यास घेतला. कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत यांनी सहा महिन्यांत कारखान्याचे काम पूर्ण करून कारखाना सुरू केला. दरम्यान, कारखान्याच्या मोळी पूजन कार्यक्रमात पालकमंत्री डॉ. सावंत यांनी जिल्ह्यात सर्वाधिक २ हजार ८२५ रुपये प्रति टन दर देण्याची घोषणा केली होती. तेरणा कारखान्याने २० नोव्हेंबर ते २० मार्च २०२३ या दरम्यान तब्बल ३ लाख १२ हजार ८७८ मेट्रिक टन उसाचे गाळप केले. गाळप केलेल्या या उसाचे बिलही शेतकर्यांच्या बँक खात्यावर प्रति टन २ हजार ८२५ रुपये या दराप्रमाणे जमा करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

# विशाळगड येथील तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई करा

## दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निलंबन करा; ॲड.शेख शफीक भाऊ यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

गाजापुर (विशालगड) येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ आज एआयएमआयएम पक्षाच्या वतीने पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ आणि शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्फत राज्य शासनाला निवेदन पाठवले आहे.

गाजापुर (विशालगड) मध्ये झालेल्या निंदणीय घटना ज्यामध्ये अतिक्रमणच्या नावाखाली विशेष करून मुस्लिम समाजाच्या धार्मिक स्थळांना (मस्जिद, दर्गा) व धार्मिक पुस्तके (पवित्र कुराण) यांची विटंबना करण्यात आली. तसेच विशेष करून मुस्लिम समाजाच्या घरांना टार्गेट करण्यात आले. या झालेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध एआयएमआयएम पक्ष बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे. एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी, प्रदेशाध्यक्ष तथा माजी खा.इम्तियाज जलील, कार्याध्यक्ष डॉ. गफ्फार कादरी, मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला साहेब यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत शासनाला पाठवलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, हल्लेखोरांवर युएपीए कायद्याअंतर्गत हलेखोरांवर कडक कारवाई करण्यात यावी. संबंधित निष्क्रिय पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे. झालेल्या हल्ल्यामध्ये धार्मिक स्थळे व मुस्लिम समाजाच्या घरांची शासनाने नुकसान भरपाई द्यावी. हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या प्रत्येकाला प्रत्येकी ५ लाख रुपये सरकार तर्फे देण्यात यावे. मुस्लिम समाजासाठी संरक्षण कायदे तात्काळ विशेष अधिवेशन बोलावून तात्काळ पारित करण्यात यावे. या सर्व घटनेची सीआयडी मार्फत सखोल चौकशी यावी. जर या मागण्या मान्य झाल्या नाही तर एआयएमआयएम पक्ष लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करेल. असा इशाराही देण्यात आला. यावेळी नगरसेवक तथा युवक जिल्हाध्यक्ष शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ लालु, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, तालुका उपाध्यक्ष साजन चौधरी, युवक शहराध्यक्ष शेख सलमान, बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद, सोशल मिडिया जिल्हाध्यक्ष सोहेल शिकलगार, युवा नेते नईम मेम्बर, वार्डाध्यक्ष शेख नेहाल, आरोग्य शहराध्यक्ष सोहील मोमीन, सलमान शेख, सय्यद अमन, सलमान भाई, आमेर भाई, बब्बु भाई, मोहसीन तांबोळी, शारेक काझी, आमेर भाई, हबीब भाई व आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






**आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहा –ॲड. शफीक :** सर्व आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते यांना आवाहन करण्यात येते की, एआयएमआयएम राष्ट्रीय अध्यक्ष खा.बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा.खा. इम्तियाज जलील, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. गफ्फार कादरी, मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला यांच्या आदेशावरून गाजापुर (विशालगड) या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी नमाज नंतर सर्व तालुका व शहर तहसील कार्यालय येथे धरणे आंदोलन, मोर्चे, निदर्शने करून निषेध व्यक्त करण्यात येणार आहे.

# बीड शहराला अळ्यांयुक्त गढूळ पाण्याचा पुरवठा

## मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी यांनी फिल्टर प्लांट कडे लक्ष द्यावे



बीड । प्रतिनिधी

नगर परिषदेकडून बीड शहराला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या फिल्टर प्लांट कडे बहुतेक अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याने शहराला अळ्या युक्त गढूळ पाण्याचा पुरवठा होऊ लागला आहे. यामुळे बीड शहरवासियांना आरोग्य समस्या उद्भवू शकतात. कारण प्रत्येक जण जारचे विकत पाणी घेऊ शकत नाही. तरी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे आणि नवनियुक्त जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जातीने लक्ष घालुन बीड शहराला होत असलेला घाण पाण्याचा पुरवठा थांबवून अळ्या व गाळमुक्त पाण्याचा पुरवठा करावा अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून शहराच्या अनेक भागात नळांना पाणी आल्यानंतर ते दूषित असल्याचे दिसू लागले आहे. नळांच्या पाण्यात गेल्या बऱ्याच दिवसांपासून गाळ येतच होता. आता काही दिवसांपासून तर चक्क वळवळणाऱ्या अळ्या सुद्धा पाण्यात येऊ लागल्या आहेत. असे अळ्या युक्त गढूळ पाणी पिऊन किंवा त्याने जेवण बनवून बीडवासियांना आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागेल. अगोदरच पावसाळा ऋतूमध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य समस्या उद्भवतात यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. मानवाला इतर कोणत्याही कारणापेक्षा जास्त आरोग्य समस्या उद्भवतात ते दूषित पाण्यामुळे. इथे तर बीड शहरात बीड नगर परिषद करीत असलेला पाण्याचा पुरवठा चक्क अळ्या व गाळ मिश्रित असल्याने किती मोठ्या प्रमाणात बीड शहरवासियांना आरोग्य समस्या उद्भवतील याचा विचार सहज येईल.

हे पाहता बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे तसेच नवनियुक्त जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जातीने बीड शहराला पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या फिल्टर प्लांट ची पाहणी करावी तसेच आणि अळ्या युक्त गढूळ पाणी कोणत्या कारणामुळे येत आहे, याची सखोल चौकशी करावी. कामात कुचराई करणारे पाणीपुरवठा अधिकारी आणि कर्मचारी दोषी आढळल्यास अशांवर कडक कारवाई करावी. बीड शहरवासीयांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना पाठीमागे घालता कामा नये. असेही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

# सामूहिक बलात्कारानंतर महिलेची हत्या करणाऱ्यांना फाशी द्या- गोरख काळे

बीड । प्रतिनिधी

शीळ गावातील घोळ गणपती मंदिर परिसरात एका ३० वर्षीय विवाहित महिलेवर तीन नराधमांनी सामूहिक बलात्कार करून तिचे डोके जमिनीवर आपटून निर्गुण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे या घटनेतील तीनही आरोपींना पोलिसांनी अटक केल्याची माहिती शीळ डायगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे त्या तीन नराधमांना पोलीस ठाण्यामध्ये आणून सखोल चौकशी केली असता मुंबईत राहणाऱ्या तीन नराधमांनी १) श्याम सुंदर शर्मा २) संतोष कुमार मिश्रा ३) राजकुमार पांडे या तिन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा त्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी या खटल्यात महाराष्ट्रातील निष्णांत कायदेपंडित वकिलांची नेमणूक करावी पीडित कुटुंबांची मुख्यमंत्री गृहमंत्री कलेक्टर पोलीस आयुक्त महिला आयोग यांनी भेट देऊन मदत व सांत्वन करावे पीडित कुटुंब हे अत्यंत दहशतीखाली आहे त्या पिढीत महिलेला चार वर्षाचे लहान मुल आहे त्यामुळे त्या लहान मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने घ्यावी पीडित मुलगा सज्ञान होताच त्याला सरकारी नोकरी देण्यात यावी अशी मागणी मांगारूडी समाजाचे जिल्हा अध्यक्ष गोरख काळे यांनी केली आहे अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

जुन्या चित्रपटात घरातून रुसून गेलेली महिला मंदिरात जाबची परिवार सगळं शोधून झाल्यावर मंदिरात जायचे तिथे मंदिराच्या कॉलम ला पाठ देऊन बसलेली ती दिसायची. शेवटी तो चित्रपटच म्हणावं लागेल. वास्तव मात्र भयानक आहे. नवी मुंबई बेलापूर भागातील आग्री समाजाची पीडित असून तिच्यावर झालेला अन्याय खूप मोठा आहे. धर्म आणि जात बघून आमच्याकडे मीडियात बातमी बनते. नेत्यांच्या विरोधासाठी सुद्धा जात धर्म खूप महत्वाचा आहे. सरकारला सुद्धा न्याय देण्यासाठी जात धर्म दलित किंवा मुस्लिम असता तर आता पर्यंत एन्काऊंटर झालं असतं. लव्ह जिहाद म्हणून बोंबलनारे ते टिल्लू पोरग कुठंय? ही बहीण वाटत नसेल त्याना? त्याला पाहिजे त्या जातींचे आरोपी भेटले नसावेत? ती बाई एक पत्रकार परिषद घेऊ शकत नाही कारण तिला आरोपीची जात महत्वाची वाटत असेल. काय राज्य आहे हे? किती भयंकर घटना आहे आणि चर्चा कुठेच नाही. यांना मंदिराचे अस्तित्व महत्वाचे वाटत असावे ? या घटनेतील पीडितेच्या घरी कुणीच गेलं नाही पण न विसरता अंबानीच्या पोराच्या लग्नाला सगळे गेले, नाचत बसले यावरून समजते ही किती असंवेदनशील व्यवस्था आहे.

## केएसपी विद्यालयामध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी



बीड । प्रतिनिधी

रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त लहान मुलांची दिंडी उत्साहात संपन्न झाली. काही विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात आले होते तर काही विद्यार्थी वारकरी पेहरावात आले होते.

या छोट्या वारकऱ्यांनी हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, हरी नामाचा गजर केला. विद्यार्थ्यांचे ते मनमोहक रूप साक्षात विठ्ठल रुक्मिणी च्या रुपाची आठवण करून देत होते. अतिशय उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात मुलांची दिंडी काढण्यात आली. जय हरी विठ्ठल नामाचा गजर करत मुलांची दिंडी शाळे जवळील मंदीरात जाऊन संपन्न झाली. यावेळी मुलांना फराळ वाटप करण्यात आला. आपल्या भारतीय सण, उत्सव, समारंभ संस्कृतीचे जतन करणे हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ऋषिकेश शेळके, संस्थाध्यक्षा अंजली शेळके, प्र. मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत आषाढी दिंडी साजरी करण्यात आला.

## आषाढी एकादशी निमित्त राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाची दिंडी

बीड । प्रतिनिधी

शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी ज्ञानेश्वर माऊली संत तुकाराम महाराज त्याचप्रमाणे वारकरी अशा वेगवेगळ्या वेशभूषेत व मुलींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन टाळ मृदंगाच्या आवाजाने सर्व परिसर दुमदुमून निघाला . विठ्ठलाचा जयघोष करत पायी दिंडीत विद्यार्थी शिक्षक पालक सहभागी झाले होते. परिसरातील नागरिकांनी दिंडीचे आपापल्या घरासमोर रांगोळी व औक्षण करून स्वागत केले. दिंडीतील विद्यार्थ्यांना अयोध्या नगर येथे साईराम मच्छिंद्र धायगुडे मित्र मंडळ यांच्या तर्भे साबुदाणा खिचडी वाटप करण्यात आले. या दिंडीत पहिली ते बारावीचे दोनशे विद्यार्थी सहभागी होते . दिंडीचे आयोजन एम.आय.डी.सी.रोड रामतीर्थ मार्गे भैरवनाथ मंदिर अयोध्या नगर ते शाळा असे करण्यात आले होते- सावित्रीबाई गाईड पथक भगतसिंग स्काऊट पथक च्या विद्यार्थ्यांनी विणा पखवाज व वारकरी संप्रदाय वेशभूषेत सहभाग घेतला. शाळेमध्ये दिंडी आल्यानंतर विद्यार्थी शिक्षक शिक्षिका यांनी गोल रिंगण करून भजन गायन करत फुगडी खेळली. विद्यार्थ्यांना शाळेत केळी व साबुदाणा खिचडीचे वाटप करून दिंडीचा समारोप करण्यात आला.



# किड प्रादुर्भावामुळे सोयाबीन उत्पादक संकटात

## कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यात ''कृषी'' विभागाला रिक्त पदांची किड

लिंबागणेश । प्रतिनिधी

सोयाबीन पिक शेतकऱ्यांसाठि आर्थिक दृष्ट्या महत्वाचे असुन खरीप हंगामात पावसाला चांगली सुरुवात झाली आहे.सध्या सगळीकडे सोयाबीन वाढीच्या अवस्थेत असताना सतत पाऊस व ढगाळ वातावरण यामुळे सोयाबीन पिकांवर मोठ्या प्रमाणात पाने खाणाऱ्या खोडमाशी ,चक्रीभुंगा, विविध उंटअळया,तंबाखुवरील पाने खाणारी अळी,केसाळ अळ्या, तुडतुडे,पांढरी माशी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.तर काही ठिकाणी पिवळा मोझक विषाणूंमुळे सोयाबीनचे पिक अचानक पिवळे पडणे,वाळणे आदि लक्षणे आढळुन येत आहेत.त्यामुळे उत्पादनात मोठी घट होऊन सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी स्थळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची मागणी लिंबागणेश येथील अर्जुन गिरे, रामकिसन गिरे, चंद्रकांत आवसरे, श्रीहरी निर्मळ, सर्जेराव मुळे,सुदाम मुळे, रामदास मुळे, समाधान मुळे, अझीम सय्यद यांनी केली आहे.



कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यातच कृषी विभागाला रिक्त पदांची किड लागली असुन मंजूर पदाच्या निम्मी पदे रिक्त आहेत.कृषी उपसंचालक, तसेच बीड, माजलगाव,व अंबेजोगाईचे उपविभागीय कृषी अधिकारी, आत्माचे प्रकल्प संचालक व जिल्हा परीषदेचे कृषी विकास अधिकारी ही गट अ संवर्गाची सहा पदे मंजूर असुन विशेष म्हणजे सहाही पदे रिक्त आहेत.तर तालुका कृषी अधिकारी,तंत्र अधिकारी , जिल्हा मृद सर्व्हेक्षण व मृद चाचणी अधिकारी, जिल्हा गुणनियंत्रक निरीक्षक, लेखाधिकारी, कृषी अधिकारी,मंडळ अधिकारी ही गट ब संवर्गातील ३० पदांपैकी केवळ ३ पदे भरलेली आहेत. एकंदरीतच या संवर्गातील तब्बल ९० टक्के पदे रिक्त आहेत. एवढेच नव्हे तर कृषीमंत्री धनंजय मुंडेंच्या परळी तालुक्यालाही नाहीत कृषी अधिकारी त्यामुळे तातडीने पदे भरण्यात यावीत यासाठी गेल्या वर्षभरापासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वारंवार निवेदने आणि आंदोलन करूनही अद्याप रिक्त पदे भरण्यात आली नाहीत.

### शेतकरी लाभांपासून वंचित

कृषी विभागातील निम्मी पदे रिक्त असल्याने अपु-या मनुष्यबळावर काम करताना कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही ताण आहे.प्रशासनाने ठरवुन दिलेले उद्दिष्ट पूर्ण करताना आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींना उत्तरे देताना या विभागाच्या नाकीनऊ येत आहेत तर शेतकऱ्यांसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या थेट लाभांच्या योजनावरही परीणाम होत आहे.महाडिबीचे लाभ, यांत्रिकीकरण योजना, बियाणे -खतांचा पुरवठा, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना,पिक विमा योजना, पंतप्रधान किसान सन्मान योजनांची अंमलबजावणी नीट होत नसल्याने परीणामी शेतकरी थेट लाभापासून वंचित रहात आहेत.

## रात्रिच्या पाहऱ्याने नागरिक त्रस्त, पोलीसांमार्फत नागरिकांशी लोकसंवाद




बीड । प्रतिनिधी

शहरात सर्वत्र चोर्यांचे वातावरण असून नागरिक भयभीत झाले आहेत त्यामुळे भयभीत नागरिकांसाठी नगरसेवक बनसोडें व तरुण सहकार्यनी पोलीसांमार्फत नागरिकांशी लोकसंवाद कार्यक्रम बापुजी नगर येथील जिनिअस इंग्लीश स्कुलमध्ये प्रभाग क्र.२४ चे नगरसेवक रणजित बनसोडे व युवकानि घेतला असून कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक खेडकर, संजय राठोड सह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या.

यावेळी आपल्या मनोगतामध्ये पोलीस निरीक्षक खेडकर म्हणाले की, वाढत्या चोर्यांवर अंकुश लावण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाईल परंतु कोणाला अडवून कायदा हातात घेवू नका, या परिसरात पोलिस चौकीसाठी प्रयत्न करू,तसेच संशयितांना देखील मारहाण करु नका, रात्रीचे गस्तसाठी पोलिस कर्मचारी वाढउ, व्ययोवृद्ध नागरिकानी जागरण करू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक खेडकर यांनी केले आहे. तसेच यावेळी आपल्या मनोगतात नगरसेवक रणजित बनसोडे, बापू वाघमारे, घाड़गे, डोके, शिरसट,चकरे, परशुराम खोड़, बीडकर,बंटी धुताडमल यांनी मनोगत व्यक्त केले धानोरा रोड, अंकुश नगर भागात पोलीस कर्मचारी वाढवा, पोलीस चौकी उभी करा, नागरिकांचे भय दूर करा, चौराच्या अफवा थाबवा, गस्त पथक वाढवा अश्या अनेक मागण्या बोलताना नागरिकानी केल्या असून नागरिकांना संरक्षण द्यावे असे नगरसेवक रंजीत बनसोडे यांनी म्हटले व नरसोबा नगर, अंकुश नगर, धानोरा रोड परिसरातील तरुनाचे व नागरिकाचे कौतुक केले आहे, यावेळी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या.

# आ.आजबे यांनी कपारीच्या विठ्ठलाचे दर्शन घेऊन २० लक्ष रुपयांच्या सभामंडपाचे नांदूर येथे केले भूमिपूजन

**आष्टी प्रतिनिधी**

नांदूर विठ्ठलाचे हे आष्टी तालुक्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळखले जाते या ठिकाणी आषाढी एकादशी निमित्त मोठे भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात तर वर्षभर या ठिकाणी भक्तांची ये जा असते त्यामुळे विठ्ठल मंदिर परिसरातील सुधारणा करण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत या ठिकाणी ज्या सुविधा लागतील त्या सुविधा पुरवण्यासाठी आपण यापुढेही प्रयत्न करणार असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी २० लक्ष रुपये किमतीच्या सभा मंडपाचे भूमिपूजन करतेवेळी नांदूर येथे सांगितले आषाढी एकादशीनिमित्त आ. बाळासाहेब आजबे काका यांनी नांदूर येथे कपारीचे विठ्ठलाचे दर्शन घेत मंदिर परिसरात २० लक्ष रुपये



किमतीच्या सभामंडपाचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी ते बोलत होते .

आषाढी एकादशी निमित्त आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी नांदूर विठ्ठलाचे या ठिकाणी जाऊन प्रथम कपारीच्या विठ्ठलाचे दर्शन घेतले त्यानंतर या ठिकाणी भरलेल्या भव्य यात्रेची पाहणी केली व नांदूर ग्रामस्थ विठ्ठल मंदिर कमिटी बरोबर या ठिकाणच्या विकास कामाबाबत चर्चा करून २० लक्ष रुपये किमतीच्या सभामंडपाचे भूमिपूजन यावेळी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध असे हे देवस्थान असून या देवस्थानचा विकास होणे गरजेचे आहे या अगोदरही आपण या ठिकाणी वेगवेगळे विकासाची कामे मंजूर करून दिली आहेत ते कामे पूर्ण झाले आहेत व आज या ठिकाणी आवश्यक असणारा सभामंडपासाठी वीस लक्ष रुपये वर्क ऑर्डर मी देत असून लवकरच हा सभामंडप नांदूर ग्रामस्थांनी भाविकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावा असे आवाहन करत यापुढे या ठिकाणी लागणाऱ्या विकास कामासाठी आपण नेहमी प्रयत्नशील राहू असा शब्दही नांदूर ग्रामस्थांना यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी दिला या कार्यक्रमासाठी धैर्यशील थोरवे महादेव डोके बाबासाहेब भिटे शामराव फसले सरपंच संजय जाधव नांदूरचे उपसरपंच पप्पू शेठ गवळी ग्रामस्थांसह परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी एकादशी निमित्त फराळ वाटप




**बीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी विठ्ठल रखुमाईचे मनोभावे दर्शन घेऊन श्री.जगदंबा पेट्रोलियम बीड पिंपळनेर रोड, बाभळवाडी फाटा येथे पिंपळनेर परिसरातील सर्व भाविक भक्तांना साबुदाणा खिचडी व केळी वाटप केली. यावेळी राघूजी आण्णा सातपुते, ग्रामपंचायत सदस्य रामेश्वर सर सातपुते, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण सातपुते,सोसायटी मेंबर कल्याण काळे, सोसायटी मेंबर नंदू बिटे,केरबा मातकर,शिवाजी निर्धार,राम शिंदे,कल्याण सातपुते सर,पिनु सातपुते, हनुमान निर्धार,राजेंद्र सातपुते,गोरख भटे, पांडुरंग सातपुते,गणेश सातपुते सह गावातील सर्व वरिष्ठ व तरूण सहकारी मित्र उपस्थित होते.

## भाजपाच्या जिल्हाध्यक्षपदी सर्जेराव तांदळे यांची निवड करा: हनुमंत मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब





यांच्यापासून पंकजाताई आणि प्रीतमताई यांना सर्जेराव (तात्या) तांदळे यांनी खंबीर साथ दिली आहे. अशा भाजपातील लढवाय आणि कणखर नेत्याची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्याची गरज आहे. सर्जेराव तांदळे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करावी अशी मागणी, उपसरपंच हनुमंत (बप्पा) मुंडे यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात उपसरपंच हनुमंत मुंडे यांनी म्हटले आहे, भाजपाने आता खरा निष्ठावंतांना न्याय देण्याची गरज आहे. जे लोक आपल्या गावातून भाजपासाठी मते देऊ शकत नाहीत, त्यांना पक्षाने पोसायचे का? असा सवाल पारंपारिक भाजप मतदारांना पडला आहे. यामुळे आता भारतीय जनता पार्टी आणि पंकजाताई यांनी भाजपाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी सर्जेराव तांदळे यांच्यासारख्या खंबीर आणि कणखर नेत्याची निवड करावी, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाला निवडीने मोठा फायदा होईल जिल्ह्यामध्ये तरुणाची मोठी ताकत सर्जेराव तात्या तांदळे यांच्या पाठीशी आहे असे धारूर तालुक्यातील युवा नेते तथा उपसरपंच हनुमंत मुंडे यांनी म्हटले आहे.

# आरोग्य सेवेतुन सुद्धा ईश्वर सेवा घडते -जगताप

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आषाढी एकादशीनिमित्त गजानन हॉस्पिटल च्या त्वचारोग तज्ञ डॉ. ऐश्वर्या खंडागळे यांचे काल दि. १७ जुलै रोजी श्री क्षेत्र नारायण गड ता. जि. बीड येथे मोफत त्वचारोग तपासणी, व उपचार शिबीर संपन्न झाले. या शिबिरास आशिर्वाद रुपी शुभेच्छा ह.भ.प. महंत शिवाजी महाराज मठाधिपती श्री क्षेत्र नारायणगड यांनी दिल्या, आषाढी एकादशीचे अवचित्य साधून श्री क्षेत्र नारायण गड येथे सकाळी १०.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत मोफत त्वचारोग तपासणी व उपचार शिबीराची उभारणी केली होती. सुप्रसिद्ध त्वचारोग व सौंदर्यशास्त्र तज्ञ श्री गजानन स्किन क्लिनिकच्या संचालक डॉ. ऐश्वर्या खंडागळे यांनी शिबिरात तब्बल १५७ रुग्णांची मोफत तपासणी करून मोफत औषध



उपचार दिले.

या शिबिरात वारकरी, महिला, पुरुष, भाविक भक्तांसह पोलीस कर्मचारी यांनी पण उपचार घेतले. आषाढी एकादशी निमित्त घेण्यात आलेले, हे शिबीर अत्यंत महत्वाचे ठरले असून वारकरी, भाविक भक्त व ग्रामीण भागातील लोकांना याचा खुप चांगल्या पद्धतीने लाभ घेता आला, या शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांची होती. याबरोबरच बळीराम गवते, भगवानराव गवते, डॉ. अमोल खंडागळे पुजा ताई मोरे, सुनिल भाऊ अनभुले, सुनिल गवते यांची देखील उपस्थिती लाभली होती. या शिबिराचे आयोजन चंद्रसेन खंडागळे तसेच सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी केले होते व या पुढे हि समाज हितासाठी असे आणखी आरोग्य शिबिरे घेण्याचा संकल्प केला.



## न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये दिंडी सोहळा उत्साहात साजरा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये आज आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांच्या पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शाळेतील प्री प्रायमरी गट ते उच्च माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यात सहभाग नोंदवला . प्राथमिक गटाचे विद्यार्थी विविध संतांच्या भूमिकेत आले ; जनु काही आज शाळेत संताची मांदीयाळी अवतरली होती. त्यामुळे उत्साह आणि

◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांनो, गायगोठे-विहिरीच्या वैयक्तिक लाभाचे पूर्ण पैसे घ्या

## पैसे खात्यात मिळणार -ॲड. अजित देशमुख

बीड (प्रतिनिधी) रोजगार हमी योजनेच्या वैयक्तिक लाभाच्या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दिले जाणारे वैयक्तिक गाय गोठे आणि विहिरी यांचे पैसे ग्रामपंचायत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात देत नव्हते. आता ते पैसे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात देण्याचे आदेश गेवराई तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत यांना प्राप्त झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्व लाभाचे पूर्ण पैसे घ्यावेत. आपल्या योजना पूर्ण कराव्यात. दलालांना एक रुपया देखील सोडू नये. शेतकऱ्यांनी कामे पूर्ण करावीत. दलालांना दिलेले पैसे देखील परत घ्यावेत, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

नियमाचे उल्लंघन करून पळवाटा शोधन्यामध्ये बीड जिल्हा महाराष्ट्रात नंबर एक वर आहे. मात्र आम्ही ज्या ठिकाणी हात घातला, त्या ठिकाणी प्रशासनाला उत्तर नसते. त्यामुळे गेवराई तालुक्यातील हा प्रकार ओळखण्यात आम्हाला यश आले. तालुक्यात अनेक गावात असे प्रकार आहेत. ते आम्ही प्रशासनाला कळवले आहेत. त्यामुळे धोंडराई सह अनेक गावे आता सरळ चालतील. या गावांना दोष देण्यापूर्वी खरी दोषी पंचायत समिती आहे. आता आमचे लक्ष जिल्ह्यातील अन्य तालुक्यांकडे आहे.

शेतकऱ्यांच्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा, हा या मागचा उद्देश आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वैयक्तिक लाभाचा एक रुपया देखील सोडू नये. आणि आपल्या शेतात विहिरीचे आणि गाय गोठाचे काम पूर्ण करून स्वतःच्या विकासाला चालना करून घ्यावी. जर आपल्या शेतात विकास कामे झाली, तर त्याचा फायदा आज ना उद्या आपल्याला होणार आहे.

विहिरीला पाणी वाढले तर निश्चितच पीक चांगले येईल. पिक चांगले आले तर निश्चितच गाय गोठ्यात दोनच्या ऐवजी चार गायी येतील. शेतकऱ्याची

◀◀ पान २ वर

## संकल्प विद्यामंदिर शाळेत अवतरले साक्षात विठू- रुखूमाई




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील संकल्प विद्या मंदिर शाळेमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळा आयोजित करण्यात आला यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी ,संत तुकाराम ,संत ज्ञानेश्वर ,संत एकनाथ संत जनाबाई, आणि वारकरी यांच्या वेशभूषा केल्या होत्या.

बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. नरेंद्र काळे साहेब, श्री पंडित चव्हाण सर तसेच पालक सौ.कोमल-श्री विशाल चिंचाळकर, सौ. प्रतीक्षा - श्रीकांत खुणे, सौ. दुर्गा-श्री.चंद्रशेखर कुलथे यांच्या हस्ते विठ्ठलाची आरती करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा शाळेच्या वतीने विठ्ठलाची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. डॉ.नरेंद्र काळे साहेब यांनी शुभेच्छापर मार्गदर्शनामध्ये संकल्प विद्यामंदिर

◀◀ पान २ वर

# पत्रकार सुनील कावळे यांच्याकडून विभूते कुटुंबीयांना दहा हजार रुपयांची मदत करून केला वाढदिवस साजरा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शहरातील गायकवाड गल्ली येथील तरुण दत्ता विभुते यांचा अपघात होऊन दि.०१/०३/२४ रोजी निधन झाले होते घरातील कर्ता माणूस गेल्याने विभुते कुटुंबियावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे तसेच विभुते कुटुंबाला आर्थिक चन चन जाणवत आहे याची जाण ठेवून पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सुनील कावळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वायफळ खर्चाला फाटा देत नंदनी दत्ता विभोते या १३ वर्षीय मुलीच्या नावाने दहा हजार रुपयांची एकटी करून विभुते कुटुंबीयांना पूर्ण फुलाची पाकळी म्हणून आर्थिक मदत केली आहे त्यांच्या या निर्णयाने समाजासमोर एक आगळावेगळा आदर्श ठेवला



आहे त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सध्या धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्याची क्रेज निर्माण झाली आहे लहान मुलापासून ते मोठ्या व्यक्तीपर्यंत सर्वांचेच वाढदिवस मोठे खर्च करून साजरी करण्यात येत आहेत अतिरेकी सजावट फुगे पुणे मेंबर त्या जाळणे फटाके वाजवणे बॅनर बाजी करून वाढदिवस साजरा करण्याची स्पर्धा सध्या पाहायला मिळत आहे मात्र या सर्व गोष्टींना फाटा देत सामाजिक आत्मभान कायम ठेवून सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्याची प्रथा पाढण्याची गरज आहे हीच बाब लक्षात घेऊन धारुर येथील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सुनील कावळे यांचा वाढदिवस १७ जुलै रोजी संपन्न झाला त्यांनी वाढदिवसाला इतरत्र होणारा खर्च टाळून


◀◀ पान २ वर

# आजही ग्रामीण भागात प्रवासी वाहतूक म्हणून कंमाडर जीपलाच मागणी

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

पुर्वी ग्रामीण भागातील रस्ते खराब व मजबूत नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात ये-जा करण्यासाठी लालपरी बसची व्यवस्था नसल्याने त्याकाळी मिळेल त्या वाहनाने किंवा पायी चालत नागरिकांना शहरात यावे लागत होते.साधरण १९९५-९६ दरम्यान रस्त्यावर केवळ कमांडर जीपचेच साम्राज्य होते. कमांडर जीप हि ग्रामीण भागातुन शहराच्या ठिकाणी कामासाठी नागरीकांना वाहतुकीचे साधन म्हणून ओळखली गेली,परंतु आजही ग्रामीण भागातील प्रवासी वाहतूकीसाठी प्रवासी कमांडर जीपलाच पसंती देतात.

पुर्वी ग्रामीण भागात रस्ते खराब व मजबूत नसल्याने तालुक्यातील अनेक गावांत ललपरी म्हणजे बसची व्यवस्था नसल्याने ग्रामीण भागातील अनेक नागरीकांना शहराच्या ठिकाणी विविध कामांसाठी यावे लागत होते,मात्र खराब रस्त्यामुळे दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्याने नागरिकांना बैलगाडी किंवा पायी चालत यावे व जावे लागत असे सन १९९५-९६ दरम्यानच्या काळात कमांडर जीप हि प्रवासी वाहतूकीसाठी बाजारात उपलब्ध झाल्यानंतर तालुक्यातील ज्या ठिकाणी खराब व मजबूत रस्ते नसलेल्या भागात व लालपरी बस उपलब्ध नसणाऱ्या ठिकाणी ग्रामीण भागातील नागरिकांना प्रवासी वाहतूकीसाठी कमांडर जीप उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय दुर झाली.त्याकाळी कमांडर जीपला प्रवासी वाहतुकीसाठी केवळ चालक सोडून ९ प्रवासी गाडीत बसवण्याची आर.टी.ओ.ची परवानगी असायाची,कमांडर जीप हि मजबुत असल्याने ग्रामीण भागातील कोणत्याही खराब व मजबूत नसलेल्या रस्त्यावर प्रवासी मर्यादापेक्षाही जास्त प्रवासी असली तरी व्यवस्थीतपणे धावायची,त्याकाळी ग्रामीण भागातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांना या कमांडर जीपने रोजगार उपलब्ध करून तर दिलाच, परंतु ग्रामीण भागातील नागरिकांना प्रवासासाठीची व्यवस्था केली.कालांतराने राज्य सरकारने २००४ सालापासून काळ्या-पिवळ्या टॅक्सीचे नियम केल्याने ग्रामीण भागातील नागरीकांचे मुख्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या कमांडर जीप वर गंडांतर आले.परंतु आजही ग्रामीण भागात प्रवासी वाहतूक म्हणून कांमाडर जीपलाच प्रवसांची पसंती असल्याचे शुक्लतिर्थ लिमगांव येथील कमांडर जीप चालक मुंजा पांचाळ यांनी दै राज्य लोकतंत्रशी बोलताना सांगितले.




## परवानगी ९ प्रवासाची,कमांडर जीपमध्ये भरायचे ३२ प्रवासी

पुर्वी माजलगाव -पवारवाडी-निपाणी टाकळी-शु.ती.लिमगाव-मोगरा-डाकेपिंप्री-खतगव्हाण-डिग्रस-पोहनेर हा रस्ता खराब व मजबूत नसल्याने या मार्गावर बसची व्यवस्था नसल्याने त्याकाळी या रस्त्यावर कमांडर जीपच प्रवाशांना प्रवासाचं मुख्य साधन होतं, त्यावेळी या रस्त्यावरील गावातील माजलगावला येण्यासाठी व जाण्यासाठी प्रवासी संख्या जास्त असल्याने कामांडर जीपचे चालक हे कंमाडर जीपची परवानगी ९ प्रवाशांची आसतांन सुध्दा चालक प्रवाशांना गाडीत आतमध्ये १० ते १२ प्रवासी बसवायचे नंतर गाडीच्या टपावर १० प्रवाशी, गाडीच्या बोनटवर ४ ते ५ प्रवाशी व गाडीला लटकावून ५ ते ६ प्रवाशी असे एकुण बसावाचे तरी पण कमांडर जीप थोडीपण कुचमत नसायाची व खराब रस्त्यांनी प्रवाशांचा प्रवास सुखकर करायची.

कमांडर जीपला सीट बेल्ट तर सोडा,साधा दरवाजा सुद्धा नव्हता कमांडर जीपला लेदरचे पडदे असायचे पण ते सुद्धा चालक गुंडाळून ठेवायचा.सरकारने काळी - पिवळी टॅक्सीचा नियम करण्यापूर्वी ग्रामीण भागातील प्रवासाचं मुख्य साधन केवळ ''कमांडर जीपच'' होती.कमांडर जीपची दणकट बॉडी,जवळपास नो सस्पेंशन कितीही माणसं भरा ! आत,भरा,दारात लटकवा,टपावर बसवा ! ही गाडी चलतच राहायची. प्रवासी वाहतुक करणारे ड्रायवर तर जवळजवळ एका पायावर म्हणजे ? अर्धा आत अर्धा बाहेर लटकलेला गाडी चालवायचा, या गाडीने खुप प्रवास केलाय त्यातले त्यात या गाडीच्या ड्रायवरकडचे कॅसेटमधले गाणे म्हणजे ? तर काय विचारूच नका ! जगभराचा सगळा ''दर्द'' केवळ यांच्याच कडे असायचा

- धोंडीराम कदम,( प्रवासी) मोगरा

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘लाडकी बहीण योजने’वर शरद पवार पहिल्यांदाच बोलले; अजित पवारांचं नाव घेत आर्थिक ताळेबंदच संगितला



पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या महत्वाकांक्षी योजनेवरुन विरोधकांकडून राज्य सरकारला चांगलंच ट्रोल केलं जात आहे. दुसरीकडे या योजनेचं गावोगावी स्वागत होत असून महिलांनी जास्तीत जास्त संख्येने या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही राज्य सरकारच्यावतीने केलं जात आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्रीही आपल्या प्रत्येक भाषणात, कार्यक्रमात लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करताना महिलांना या योजनेतून आर्थिक स्थैर्य देण्याचा प्रयत्न असल्याचंही बोललं जातं. या योजनेवरुन विरोधकांनी टीकाही केली आहे. लाडक्या भावांचं काय, अस सवालही उद्धव ठाकरेंनी विचारला होता. आता, शरद पवार यांनीही लाडकी बहीण योजनेवर भाष्य केलं आहे.

पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि संस्थापक शरद पवार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन विविध प्रश्नांवर भाष्य केले. त्यामध्ये, विधानपरिषद निवडणुकीतील पराभव, भुजबळांची भेट, राज ठाकरेंचं ट्विट यांसह विविध प्रश्नांना उत्तरे दिली. त्यावेळी, कर्नाटक सरकारने नोकरीत ८० टक्के आरक्षण भूमिपुत्रांना देण्याचा निर्णय घेतला व राज्य सरकारच्या लाडक्या बहीण योजनेसंदर्भातही प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, कर्नाटक सरकारचा निर्णय कोर्टात टिकणार नाही, असे पवार यांनी म्हटले. तसेच, लाडकी बहीण योजनेवर बोलताना राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर भाष्य केलं. लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ.. हे यंदाच्या अर्थसंकल्पात मांडण्यात आलंय. पण, महाराष्ट्रात अजित पवार आणि जयंत पाटील यांन ६ ते ७ वेळा बजेट मांडायची संधी मिळाली. या ६ ते ७ वेळेत बहीण भाऊ कुठेही आलेले दिसले नाहीत. बहीण भावांचा विचार होतोय याचा आनंद आहे. मात्र, हा सगळा चमत्कार लोकसभा निकालातील मतदारांच्या मतांचा आहे, असे म्हणत शरद पवारांनी महायुती सरकारला पवारस्टाईल टोला लगावला. मतदारांनी मतं व्यवस्थित दिली तर बहीण-भाऊ सर्वांची अडचण होते. मलाच एकच काळजी आहे, ती म्हणजे महाराष्ट्राची आर्थिक स्थिती काय आहे.

### महाराष्ट्रावर अंदाजे ७ लाख कोटींचं कर्ज

महाराष्ट्र हा देशातील २ ते ३ क्रमांकावरील राज्य होते, मात्र नियोजन मंडळाने काही दिवसांपूर्वी यादी प्रसिद्ध केली. त्यामध्ये, महाराष्ट्र ११ व्या क्रमांकाचे राज्य आहे, हे चिंता करण्याचे चित्र आहे. सध्या महाराष्ट्राची आर्थिक स्थिती काय आहे, अंदाजे ७ लाख ८० हजार कोटींचं कर्ज महाराष्ट्राच्या डोक्यावर आहे. यावर्षीचं आत्ताचं कर्ज १ लाख १० हजार कोटींचं कर्ज हे वेगळं आहे, अशी माहिती शरद पवार यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

# इथल्या आमदारांमुळे इंदापूर राज्यात बदनाम



## पाहुण्यांकडे गेलो तरी मलिदा गँगबद्दल विचारतात; शरद पवार गटाच्या नेत्याचा हल्लाबोल

बारामती । प्रतिनिधी

इंदापूरच्या विद्यमान आमदारांमुळे संपूर्ण राज्यात इंदापूरचं नांव बदनाम झालं, कुठे पाहुण्या-रावळ्यांकडे गेलो तरी लोक मलिदा गँगबद्दल विचारतात अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे इंदापूर तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील यांनी केली. इथल्या आमदारांच्या कृत्याचा परिणाम लोकसभेला सुप्रिया सुळेंच्या विरोधात उभ्या असलेल्या उमेदवारालादेखील भोगावा लागला असल्याचं त्यांनी म्हटलं. महारुद्र पाटील यांनी नाव न घेता अजित पवार गटाचे आमदार दत्ता भरणे यांच्यावर टीका केली.

लोकसभेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती आणि इंदापूरच्या राजकारणातील युवा नेते प्रवीण माने यांच्यावरती मोठा दबाव टाकला होता, म्हणून ते अजित पवार गटात गेले असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे इंदापूर तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील यांनी केला. उद्या पक्ष ज्याला कोणाला विधानसभेचे तिकिट देईल त्याचं आम्ही काम करू, त्यामुळे प्रवीण मानेंकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असं महारुद्र पाटील यांनी म्हटलं. प्रवीण माने यांना सुप्रिया सुळे यांविरोधात काम करायचे असते तर ते गाव भेट दौऱ्यात सहभागी झाले नसते असंही महारुद्र पाटील म्हणाले.

लोकसभेच्या निवडणुकीवेळी सुप्रिया सुळेंसाठी प्रवीण मानेंनी इंदापूर तालुक्यातील साठ-सत्तर गावांमध्ये दौरा केला होता, त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही असं म्हणत महारुद्र पाटील यानी प्रवीण माने यांचे शरद पवार गटात घरवापसीचे संकेत दिले.

# पूजा खेडकर यांचा आणखी एक कारनामा! फेक रेशनकार्ड, घराचा पत्ताही निघाला चुकीचा

पुणे । प्रतिनिधी

प्रोबेशनरी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्याबाबतीत आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. पूजा खेडकर यांनी चुकीचा पत्ता आणि बनावट रेशनकार्ड वापरून दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळवले असल्याचे कागदपत्रांवरून दिसून आले आहे.




पूजा खेडकर यांना दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र कोणत्या आधारे दिले गेले, ते दस्त सापडले आहे. त्याचा अहवाल जिल्हा शल्यचिकित्सकांनी जिल्हाधिकार्यांना सादर केला आहे. खेडकर यांनी प्लॉट क्र. ५३, देहू-आळंदी, तळवडे' ते यशवंतराव चव्हाण मेमोरियल (वायसीएम) हॉस्पिटल हे त्यांचे पिंपरी-चिंचवडमधील निवासस्थान असल्याचा दावा केला आहे. मात्र, हा त्यांच्या घराचा पत्ता रहिवासी नसून बंद पडलेल्या थर्मोवेरिटा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा असल्याचे उघड झाले आहे. तसेच या कंपनीच्या पत्त्याचा वापर करून खेडकर यांनी बनावट रेशनकार्ड तयार केल्याचेही कागदपत्रांवरून निष्पन्न झाले आले. ज्याचा वापर खेडकर यांनी अस्थिव्यंग दिव्यांगत्व असल्याचा दावा करून दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी केला. २४ ऑगस्ट २०२२ रोजी जारी करण्यात आलेल्या प्रमाणपत्रात त्यांना गुडघ्याचे सात टक्के दिव्यांगत्व असल्याचे नमूद करण्यात आले होते.

पूजा खेडकर यांना दिलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र कोणत्या आधारे दिले, त्याचा दस्तावेज सापडत नसल्याने सुरुवातीला वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र, सोमवारी संबंधित केसपेपरसह अन्य महत्त्वपूर्ण कागदपत्रे अखेर हाती लागली. त्या प्रमाणपत्रांसह त्याच्याशी निगडित दस्तावेज जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या ताब्यात देण्यात आले.

याशिवाय त्यांनी थर्मोवेरिटा कंपनीच्या नावावर ऑडी कारची नोंदणी केली. पिंपरी-चिंचवड पालिकेच्या कर संकलन विभागाच्या माहितीनुसार, या कंपनीने गेल्या तीन वर्षांपासून २ लाख ७७ हजार रुपये रक्कम थकीत आहे. दरम्यान, पुण्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांच्या मालमत्तांबाबतचा सविस्तर अहवाल मंगळवारी सायंकाळी राज्याच्या मुख्यालयाकडे सादर केला. दिलीप खेडकर यांनी २०२० मध्ये निवृत्त होईपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे () संचालक म्हणून काम केले. त्यांच्यावर बेहिशोबी मालमत्ता जमवल्याचा आरोप आहे. तर पूजा खेडकर यांच्यावर बनावट प्रमाणपत्रांसोबतच व्हीआयपी मागण्यांसाठी अधिकाराचा गैरवापर करणे आणि पोलिस अधिकाऱ्यांना धमकावणे यासारखे गंभीर आरोप आहेत. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्याबाबत अहवाल सादर केला होता. त्यानंतर पूजा खेडकर यांची पुण्याहून वाशीम येथे बदली करण्यात आली.

# पुण्यात माजी नगरसेवक पुत्राचं दारुच्या नशेत हार्श ड्रायव्हिंग; हॅरियर कारने दोघांना उडवलं, गुन्हा दाखल

पुणे : शहरातील कल्याणीनगर भागात झालेल्या पोर्शे कार अपघाताच्या घटनेनंतर पुण्यातील पोलीस यंत्रणा अलर्ट झाली असून कारवाईला वेग आला आहे. पुण्यात दारु पिऊन गाडी चालवल्यास परवाना रद्द करण्यात येणार असल्याचंही पुणे पोलिसांनी यापूर्वीच सांगितलं आहे. मात्र, अद्यापही बड्य बापांची लेकरं दारु पिऊन गाडी चालवून इतरांचा जीव धोक्यात घालत असल्याचं पाहायला मिळत आहे. आधी पोर्शे कार अपघात, त्यानंतर अपघातांची मालिकाच लागल्यांचं दिसून आलं. मुंबईतील वरळीतही हीट अँड रन प्रकरण चांगलंच गाजलं. आता, पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेवकाच्या लेकानं दारु पिऊन टेम्पोला धडक दिली. त्यामध्ये, टेम्पोचालक आणि गाडीचा क्लीनर जखमी झाला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे पुण्यातील माजी नगरसेवक बंडू गायकवाड यांचा मुलगा सौरभ गायकवाड याने दारू पिऊन अपघात केलाय. ड्रंक एन्ड ड्राईव्हच्या या घटनेत कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचे ड्रायव्हर आणि क्लीनर जखमी झाले आहेत. त्याचबरोबर सौरभ गायकवाड हा देखील जखमी झालाय. पुण्यातील मांजरी-मुंढवा रस्त्यावर झेड कॉर्नर येथे मंगळवारी १६ जुलै रोजी पहाटे हा अपघात घडलाय. सौरभ गायकवाड हा त्याची १२ ०५०५ क्रमांकाची हॅरीयर कार घेऊन पहाटे पाच वाजता मुंढव्यातील घरी निघाला होता. त्यावेळी तो दारुच्या नशेत होता. त्यामुळे समोरुन येणाऱ्या पोल्ट्री फार्मच्या टेम्पोला त्याने धडक दिली. त्यावेळी, तिथे जमलेल्या लोकांनी चालक व क्लीनर राजा शेख याला वरद लाइफ हॉस्पिटल येथे घेऊन उपचारासाठी दाखल केले. त्यावेळी, चालकाच्या कपाळावर जखम झाली असून खांद्याला मुका मार लागला होता. तर क्लीनर राजा शेख याला उजव्या चेहऱ्यावर खर्चटलेले असून उजव्या पायाच्या नडगीला जखम झाली होती, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.


दरम्यान, याप्रकरणी सौरभ गायकवाडच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सौरभ गायकवाडचे वडील बंडू गायकवाड हे सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात कार्यरत आहेत.

दरम्यान, गेल्या दोन महिन्यांपासून पुणे शहरातील अपघात, ड्रग्ज प्रकरण, वाहतूक कोंडी आणि वाढती गुन्हेगारी चांगलीच चर्चेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनीही पुण्याच्या वाढत्या गुन्हेगारीवर आणि बदलत्या परिस्थितीवर भाष्य करताना, पुणे ही क्राइम कॅपिटल बनत असल्याचं म्हटलं होतं. तर, काँग्रेस आमदार रविंद्र धंगेकर यांनीही ड्रग्ज प्रकरणावरुन आक्रमक भूमिका घेत थेट राज्य उत्पादन शुल्क मंत्री आणि पुणे पोलिस आयुक्तांवर हफ्तेखोरी व भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले होते.

# झोपडपट्टीत राहातो म्हणून जामीनापासून वंचित ठेवता येणार नाही, न्यायालयाचा निष्कर्ष

पुणे । प्रतिनिधी

आरोपी महिला झोपडपट्टी परिसरात राहायला आहे, या कारणास्तव तिला जामीन मिळण्यापासून वंचित ठेवता येणार नाही,' असे नमूद करत येथील सत्र न्यायालयाने महिलेला ३० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. बी. राठोड यांनी हा आदेश दिला.



नवजात अर्भकांची पाच लाख रुपयांना तस्करी करणाऱ्या सहा महिलांना वाकड पोलिसांनी सापळा रचून अटक केली होती. ही घटना १२ एप्रिल रोजी दुपारी जगताप डेअरी चौकात घडली होती. याबाबत वाकड पोलिस ठाण्यात सहा महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यातील एक महिला आरोपी न्यायालयीन कोठडीत असून तीने जामीन मिळण्यासाठी सत्र न्यायालयात अर्ज केला. ॲड. अजिंक्य मिरगळ, ॲड. अमृता मुळे आणि ॲड. ओंकार इनामदार यांनी अर्जदार महिलेची बाजू मांडली. आरोपी महिलेने कोणताही गुन्हा केलेला नाही. तिची पोलिस कोठडीतील चौकशी पूर्ण झाली असून, तिच्याकडून काहीही जप्ती झालेली नाही.

अर्जदार महिलेची पार्श्वभूमी गुन्हेगारीची नसून, ती तपासात सहकार्य करण्यास तयार आहे, असा युक्तिवाद अर्जदार आरोपी महिलेच्या वकिलांनी केला. त्यावर आरोपी महिला झोपडपट्टी परिसरात राहात असून, त्यांनी केलेला गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. त्यांना जामीनावर सोडल्यास साक्षीदारावर दबाव आणून पुराव्यात छेडछाड करतील, असा युक्तिवाद करत सरकारी वकिलांनी तिला जामीन देण्यास विरोध केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकत न्यायालयाने महिलेला तिच्या कायमस्वरूपी पत्त्याचा पुरावा आणि ओळखपत्र जमा करायला सांगत जामीन मंजूर केला.

## आळंदी जवळच्या धानोरेत कंपनीला भीषण आग

आळंदी: आळंदी शहारा जवळ मरकळ रोड, धानोरे फाटा येथील वैशाली असेमेंट्री प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला बुधवारी (दि.१७) रोजी पहाटे तीन वाजता भीषण आग लागली होती ही आग आटोक्यात आणण्यात आळंदी नगरपरिषद, पीएमआरडीए, पीसीएमसी अग्निक्षामक दलाला यश आल्याची माहिती आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी दिली आहे.

कंपनीमध्ये आगी दरम्यान स्फोट होत असल्याने आग मोठ्या प्रमाणावर पसरत होती. परिणामी अग्निशमन दलांकडून फोम मारा करून आग आटोक्यात आणली गेली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून दीड तासांच्या प्रयत्नानंतर आग पूर्णपणे विझविण्यात आली आहे. सदर आगीत कुठलीही जीवित हानी झालेली नाही परंतु कंपनीतील सर्व साहित्य जळून खाक झाले आहे.

आग विझविण्यात आळंदी नगरपरिषद अग्निशमन दलाच्या विनायक सोळंकी, प्रसाद बोराटे, पदमाकर श्रीरामे, अक्षय त्रिभुवन, कोळपे तुळशीराम या कर्मचाऱ्यांनी तसेच पीएमआरडीए व पीसीएमसी अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर आढळून आलेले केमिकल व इतर सर्व बाबींचा पुढील तपास आळंदी पोलीस करत आहेत.

# पगारवाढीच्या निर्णयासाठी साखर कामगार आक्रमक

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील साखर उद्योग व साखर उद्योगाशी संलग्न जोडधंदयातील कामगारांच्या वेतनवाढ व सेवाशर्तीबाबतचा राज्य पातळीवर झालेला त्रिपक्षीय समितीच्या कराराची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली आहे. तरी सहकार मंत्री व अन्य संबंधितांची साखर आयुक्तांनी २५ जुलैपुर्वी साखर कामगारांच्या पगारवाढीसाठी तत्काळ बैठक आयोजित करून निर्णय घ्यावा. अन्यथा राज्यातील साखर कामगार तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाने दिला आहे.

प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस शंकरराव भोसले यांच्या नेतृत्वाखालील कामगारांच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (दि.१६) साखर आयुक्त डॉ. कृणाल खेमनार यांची भेट घेऊन चर्चा केली आणि संघटनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष राऊसाहेब पाटील, युवराज रणवरे, नितीन बेनकर, सचिव प्रदीप शिंदे व अन्य सदस्य उपस्थित होते, महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे राज्यातील साखर कारखान्यांमध्ये एक लाख कामगार सभासद कार्यरत आहेत.

संघटनेने कायद्यातील तरतुदीप्रमाणे राज्यपातळीवरील झालेल्या कराराची मुदत संपल्याने बदलाची नोटीस दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी तसेच नवीन मागण्यांची नोटीस व कामगार प्रतिनिधीची यादी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी शासनासह कामगार आयुक्त, राज्य सहकारी साखर कारखाना संघास दिली आहे. असे असूनही अद्यापही त्रिपक्ष समिती गठीत झालेली नाही. त्यामुळे साखर कामगारांत असंतोष असुन त्याचा केव्हाही उद्रेक होवु शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे. शिवाय येणाऱ्या २०२४-२०२५ च्या ऊस गळीत हंगामावर विपरीत परिणाम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## व्यवसाय करून रोजगार निर्मिती करा-चंद्रकांत पाटील

पुणे । प्रतिनिधी

‘‘प्रत्येक युवकाने सातत्याने नवीन कौशल्य आत्मसात करावेत. व्यवसाय कसा करायचा याचे प्रशिक्षण शिक्षण संस्थांनी तरुणांना द्यावे. सरकारी नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा खासगी कंपनीमध्ये नोकरी करा किंवा व्यवसाय करून इतरांना नोकरी द्या,’’ असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस व जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त भाजपचे प्रदेश प्रवक्ते कुणाल टिळक यांनी टिळक वाड्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवड झालेल्या ४००हून अधिक तरुणांना चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. खासदार मेधा कुलकर्णी, शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी उपमहापौर सरस्वती शेंडगे, हेमंत रासने, पुनीत जोशी, बाप्पू मानकर आदी यावेळी उपस्थित होते. बँकिंग, फायनान्स, सेल्स, मार्केटिंग, मॅनुफॅक्चअरिंग, केपीओ, बीपीओ आदी क्षेत्रातील ७० कंपन्या या मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या.

## पुरंदर शिक्षक पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी काळे

पुरंदर : पुरंदर तालुका सहकारी शिक्षक पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी सोमनाथ बबन काळे व कार्यलक्ष संचालकपदी दीपक जाधव यांची बिनविरोध निवड झाली.



पतसंस्थेचे सभापती दत्तात्रेय फडतरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळातील बैठकीत सोमनाथ काळे व दीपक जाधव यांची एकमताने निवड केली. निवडीनंतर सभापती दत्तात्रेय फडतरे, शिक्षक संघाचे अध्यक्ष तानाजी फडतरे, विस्ताराधिकारी राजेंद्र कुंजीर, शिक्षक संघाचे सरचिटणीस भानुदास कुंभारकर, पतसंस्थेचे उपसभापती चंद्रकांत जगताप, शिक्षक संघाचे उपाध्यक्ष नितीन मेमाणे, मानद सचिव संतोष कुंजीर, संघाचे माजी अध्यक्ष गणेश लवांडे, संस्थेचे माजी सभापती सुधीर मेमाणे, संचालक अनंता जाधव, माजी सभापती शरद पवार, शिक्षक संघाचे प्रवक्ते अशोक खेंगरे, माजी सभापती बाळासाहेब फडतरे, विलास सणस, मोहन जगताप, माजी सभापती शरद कुंभार, शिक्षक नेते दीपक बडदे, आनंद राजीवडे, ज्ञानेश्वर राऊत, बाळासाहेब भाडळे, संतोष बोरकर, प्रकाश पानवकर यांच्या उपस्थित त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. बिनविरोध निवडीबद्दल त्यांनी आभार मानले. पदाच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे सोने करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कॅम्प एज्युकेशन सोसायटीतर्फे ३०० विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी

मार्केट यार्ड । प्रतिनिधी

कॅम्प एज्युकेशन सोसायटी आणि कम्युनिटी आय केअर फाउंडेशन संचलित डॉ. गोगटे आय क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. सायरस पूनावाला हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नेत्रतज्ज्ञ डॉ. परीक्षित गोगटे व त्यांच्या टीमने ज्युनिअर कॉलेजमधील ३०० विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी केली. नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य प्रशांत वाघ, उपप्राचार्य डी. बी. मोरे, डॉ. सुप्रिया फडके, डॉ. वर्षा धिंग्रा, डॉ. अपूर्वा शितोळे, झहिद शेख, समन्वयक अभिषेक ब्रम्हे आदी उपस्थित होते.

# स्वारगेट, बिबवेवाडीत पादचाऱ्यांना लुटले

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेट आणि बिबवेवाडी परिसरात चोरट्यांनी पादचाऱ्यांकडील मोबाईल व दागिने चोरून नेल्याच्या घटना घडल्या. गुलटेकडी भागातील गिरिधर भवन चौकात मंगळवारी दुपारी तरुणाला अडवून चोरट्यांनी त्याच्याकडील मोबाईल, कागदपत्रे चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत तरुणाने स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण कोथरूड भागातील रहिवासी आहे. चोरट्यांनी तरुणाला अडवून धमकावले. तरुणाकडील १७ हजार रुपयांचा मोबाईल आणि कागदपत्रे ठेवलेली पिशवी चोरून नेली.

स्वारगेट भागातील लक्ष्मीनारायण चित्रपटगृहाजवळ पादचारी ज्येष्ठ महिलेकडील १७ हजार रुपयांची सोनसाखळी दुचाकीस्वार चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत महिलेने फिर्याद दिली आहे. मंगळवारी सकाळी नऊच्या सुमारास हा प्रकार घडला. अप्पर इंदिरानगर परिसरातील सुखसागरनगर भागात पादचारी महिलेच्या गळ्यातील पावणेदोन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने दुचाकीस्वार चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. महिलेने याबाबत बिबवेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.